


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१२४ | शुक्रवार, दि.२९ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये





# कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे भवितव्य धोक्यात !

## कोणाचीही मागणी नसताना ३१ डिसेंबरपर्यंत शुल्कमुक्त आयातीला मुदतवाढ

पुणे । प्रतिनिधी

**केंद्र सरकारने १८ ऑगस्ट रोजी कापसावरील ११ टक्के आयात शुल्क ३० सप्टेंबरपर्यंत शून्य करण्याचा निर्णय घेतला होता. अवघ्या १० दिवसांत या निर्णयाला ३१ डिसेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली आहे. कापड मिल मालकांचा दबाव व अमेरिकेच्या टॅरिफच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारातील कापसाचे दर प्रचंड दबावात आले असून, कापसाची आयात १ ऑक्टोबरनंतर किमान २० लाख गाठींनी वाढणार आहे. या आयातीचा परिणाम थेट कापसाच्या दरावर होणार असून, यामुळे शेतकरी अडचणीत येणार आहेत.**

भारताच्या तुलनेत जागतिक बाजारात कापसाचे दर कमी आहेत. त्यामुळे कापड मिल मालक दोन वर्षांपासून कापसावरील आयात शुल्क हटविण्याची मागणी करीत आहेत. त्यातच भारतीय शेतीक्षेत्र आयातीसाठी खुले करण्याच्या दृष्टीने अमेरिकेने भारतावर आधी २५ टक्के टॅरिफ लावला आणि नंतर त्यावर २५ टक्के पेनॉल्टी लावून हा टॅरिफ ५० टक्के केला. अमेरिकेला खुश करण्यासाठी केंद्र सरकारने कापड मिल मालकांची मागणी पुढे करीत १८ ऑगस्टला कापसावरील आयात ३० सप्टेंबरपर्यंत शुल्क शून्य केले. या निर्णयाचा अमेरिकेवर काहीच परिणाम न झाल्याने सरकारने कुणाचाही मागणी नसताना याला २८ ऑगस्ट रोजी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर हे कापूस वर्ष मानले जाते. कापसावर ११ टक्के आयात शुल्क असताना १ ऑक्टोबर २०२४ ते ३१ जुलै २०२५ या सात महिन्यात ३९ लाख गाठी कापसाची आयात करण्यात आली. ३० सप्टेंबरपर्यंत किमान १० लाख गाठी आणि १ ऑक्टोबरपासून ३१ डिसेंबरपर्यंत २० लाख गाठी कापसाची आयात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावर्षी सीसीआय देशभरात एमएसपी दराने ३०० लाख गाठी कापूस खरेदी करणार काय, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो. सीसीआयला ◀◀ पान २ वर

### कापसाचा दर ७ हजाराच्या आतच राहणार

भारतात सध्या रुईचे दर ५५ ते ५६ हजार रुपये प्रतिखंडी आहे. सरकीच्या दरात तेजी असल्याने सध्या भारतात कापसाचे दर ७ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटलच्या आसपास स्थिरावले आहे. कापसाची आयात वाढणार असल्याने शेतकऱ्यांना ६ हजार ५०० ते ७ हजार रुपये दराने कापूस विकावा लागणार आहे.

## थोडक्यात...

### पुण्यात आज राज्यस्तरीय साखर परिषद

पुणे: साखर उद्योगाच्या अर्थकारणाची दिशा ठरविणारा कृती आराखडा तयार करण्यासाठी शुक्रवारी (दि.२९) पुण्यात राज्यस्तरीय साखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाने संघ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यासनाकडून विद्यापीठात सकाळी १० ते ५ या वेळेत परिषद होईल. अध्यासन प्राध्यापक डॉ.अनिल कारंजकर यांनी सांगितले, की साखर उद्योगाच्या विकास व अर्थकारणावर परिषदेत सखोल चर्चा होईल. यातून पुढे येणाऱ्या धोरणात्मक मुद्द्यांचा तपशील केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांना सादर केला जाईल. कुलगुरू डॉ.अशोक गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या परिषदेत रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, शिखर बँकेचे प्रशासक अध्यक्ष विद्याधर अनास्कर, 'यशदा'चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाने महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे, 'विस्मा'चे कार्यकारी संचालक अजित चौगुले तसेच प्रभारी कुलगुरू डॉ. पराग काळकर, साखर उद्योगातील मान्यवर सहभागी होतील.

### संभल दंगलीचा अहवाल सादर

लखनौ: उत्तर प्रदेशातील संभल हिंसाचाराचा न्यायालयीन चौकशी अहवाल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना सादर करण्यात आला आहे. या अहवालात संभल हिंसाचार तसेच तेथील हिंदूंच्या लोकसंख्येचा उल्लेख आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अहवालात दावा करण्यात आला आहे की, संभलमध्ये फक्त १५ ते २०% हिंदू उरले आहेत. आता या मुद्द्यावरून राजकारण तापले आहे. भाजपने या लोकसंख्या बदलाला देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठा धोका असल्याचे म्हटले आहे. तर सपाच्या पीडीएसमोर भाजपची कोणतीही युक्ती टिकणार नाही, असे विरोधकांनी आव्हान दिले आहे.

### डॉन अरुण गवळीला १८ वर्षांनी जामीन मंजूर

मुंबई : मुंबईतील शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झालेल्या अरुण गवळीला सुप्रीम कोर्टाने गुरुवारी जामीन मंजूर केला. कोर्टाकडून दिलासा मिळाल्याने तब्बल १८ वर्षानंतर गवळीची जामिनावर सुटका होणार आहे. मार्च २००७ मध्ये मुंबईतील घाटकोपरमधील शिवसेनेचे नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांची राहत्या घरात घुसून हत्या करण्यात आली होती. निवासस्थानी टीव्ही बघत बसलेल्या कमलाकर यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या होत्या. पोलीस तपासात या हत्येची सुपारी अरुण गवळीने दिल्याचे उघड झाल्यानंतर मे २००८ मध्ये गँगस्टर गवळीला अटक करण्यात आली. मुंबईतील न्यायालयाने अरुण गवळीला याप्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

### गांधी कुटुंब तुरुंगात का नाही - केजरीवाल

दिल्ली: दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (आप) प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेस पक्षावर गंभीर आरोप केला आहे. काँग्रेसने सत्ताधारी भारतीय जनता पक्षाशी (भाजपा) गुप्त समझोता केल्याचे संकेत देत त्यांनी गांधी कुटुंबावर निशाणा साधला. नॅशनल हेराल्ड प्रकरणात गांधी कुटुंबावरील आरोप स्पष्ट असतानाही त्यांना तुरुंगात का टाकले नाही, असा थेट सवाल केजरीवालांनी उपस्थित केला. तसेच, हरियाणातील जमीन घोटाळ्याप्रकरणी रॉबर्ट वाड्रांवरही कारवाई का झाली नाही, असा प्रश्न त्यांनी भाजपला विचारला. केजरीवालांनी पुढे सांगितले की, जनता सर्व काही समजते आणि गुप्त समझोत्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# शिवनेरीवर नतमस्तक होवून मराठ्यांचा जनसागर राजधानीत दाखल

मुंबई । प्रतिनिधी

**छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या जुन्नर येथील शिवनेरी गडावर गुरूवारी मनोज जरांगे पाटील यांनी भेट देत येथील मातीचा टीळा कपाळी लावला. त्यानंतर, मुंबईच्या दिशेने मार्गक्रमण केले. रात्री उशिरा ते मुंबईत दाखल झाले. दरम्यान, रस्त्यावरील गावागावात जरांगे पाटलांचे जंगी स्वागत करण्यात आले.**

मराठा आंदोलक आणि नेते मनोज जरांगे पाटील यांनी २७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे प्रस्थान केले आहे. मनोज जरांगे यांच्या आवाहनानुसार राज्यभरातून मराठा बांधव मुंबईच्या दिशेने येत आहेत. आपले पीकअप, चारचाकी गाड्या घेऊन ते मुंबईतील आझाद मैदानाकडे आगेकूच करत आहेत. दरम्यान, एका मराठा बांधवाच्या गाडीचा अपघात झाल्याची घटना घडली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मराठा आंदोलकांचा टेम्पो उलटल्याने अपघात झाला असून तीन जण जखमी झाले आहेत. मुंबईतील फ्री वे एक्सप्रेसवरील ही घटना आहे. अपघातात उद्धव मोहिते, शिवराम ◀◀ पान २ वर




## जुन्नरजवळ मराठा आंदोलकाचा अटॅकने मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

**मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी बुधवारी (२७ ऑगस्ट) अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. गुरूवारी सकाळी मनोज जरांगे पाटील शिवनेरीवर पोहचले. यानंतर मनोज जरांगे पाटील आंदोलनासाठी मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मात्र याचदरम्यान एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. जुन्नरजवळ मराठा आंदोलकाचा हार्ट अटॅकने मृत्यू झाला आहे.**

सतीश देशमुख असे मृत व्यक्तीचे नाव असून, मुंबईतील मनोज जरांगेंच्या उपोषणापूर्वीच ही घटना घडल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सतीश देशमुखांच्या मृत्यूनंतर मनोज जरांगे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मला आता माहिती कळाली की आमचा देशमुख नावाचा बांधव प्रवासात असताना त्यांचा दम छाटला आणि त्यांना ◀◀ पान २ वर



## शक्तिपीठ महामार्गासाठी सरकारचा आक्रमक निर्णय!

मुंबई । प्रतिनिधी

शक्तिपीठ महामार्गाच्या निर्मितीसाठी सरकारने अखेर निर्णायक पाऊल टाकले आहे. भूसंपादनाचा आदेश पारित करण्यात आल्याचे समोर आले आहे. या आदेशामुळे वर्धा ते सांगली जिल्ह्यापर्यंतचा मार्ग भूसंपादनासाठी खुला होणार आहे. मात्र कोल्हापूरकरांच्या तीव्र विरोधानंतर या आदेशातून कोल्हापूर जिल्ह्याला वगळण्यात आले आहे. यामुळे आता चर्चा सुरू झाली आहे. मात्र हा फक्त तात्पुरता दिलासा असल्याचे स्पष्ट ◀◀ पान २ वर

## धस-मुंडे वादाची किनार : भाजप बंडखोर धोंडे समर्थकांना भाजपात मानाचे स्थान

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीनंतर मंत्री पंकजा मुंडे आ. सुरेश धस यांच्यातील अंर्गतवाद विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर चव्हाट्यावर आली यावर धस स्पष्ट बोलले असले तरी पंकजा मुंडे यांनी मात्र फार काही भाष्य केले नाही, मात्र जिल्हा भाजपाच्या पदाधिकारी निवडी मध्ये पंकजा मुंडे यांचे वर्चस्व पुन्हा एकदा पक्षात दिसून आले. आष्टी - पाटोदा -शिरूर मतदारसंघात भाजपाचे लोकप्रतिनिधी भाजपचे असताना निवडणुकीत बंडखोरी केलेले माजी आमदार भीमराव धोंडे समर्थकांना मात्र पक्षाच्या यादीमध्ये मानाचे स्थान दिल्याने पुन्हा एकदा मुंडे - धस यांच्या अंतर्गत वादाची किनार याला दिसून आली.**







बीड जिल्हा भाजपाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी नुकत्याच जाहीर करण्यात आल्या. या निवडीमध्ये पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे वर्चस्व दिसून आले. विशेषता जिल्हाभरातील निवडी ह्या भाजपासाठी प्रमाणिक काम करणाऱ्या व्यक्तीची दखल घेऊन निवड करण्यात आली, मात्र आष्टी-पाटोदा -शिरूर मतदारसंघात आमदार सुरेश धस यांच्या समर्थकांना पदाधिकारी निवडीमध्ये टाळले गेल्याचे दिसत आहे. मागील लोकसभा निवडणुकीमध्ये ◀◀ पान २ वर

## मराठा समन्वयकांना बजावल्या नोटीसा

पुणे। प्रतिनिधी

**जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांच्या आंदोलनाची धार कमी करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. अशातच आता मराठा समन्वयकांना पोलिसांनी नोटीसा बजावल्या आहेत.**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी इथून मुंबईकडे निघालेले मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गुरूवारी रात्री उशिरा मुंबईत पोहोचणार असून, शुक्रवारी सकाळी ते आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणास सुरुवात करणार आहेत. आरक्षण प्रश्नावरून मनोज जरांगे हे सरकारविरोधात आक्रमक झाले असून, लाखो समर्थकांसह ते मुंबईत येत असल्याने सरकारची कोंडी होणार आहे. मनोज जरांगे यांच्या ◀◀ पान २ वर

## प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालयही लवकरच बीडला होणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या मागणीची तातडीने दखल घेतली असून त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्ह्यातील उद्योगांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आता आठवड्यातील प्रत्येक बुधवारी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी बीड मध्ये उपलब्ध असणार आहेत. दरम्यान, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालय देखील लवकरच बीडमध्ये आणण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे प्रयत्नशील आहेत.




महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मराठवाडा विभागाचे प्रादेशिक कार्यालय सध्या छत्रपती संभाजीनगर येथे असून उप प्रादेशिक कार्यालय ◀◀ पान २ वर

## वाण नदीला पूर; दोघेजण वाहून गेले, एक ठार

धारूर । प्रतिनिधी

जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून पावसाने पुन्हा हजेरी लावल्याचे दिसून आले.जिल्ह्यातील बहुतांश भागात सकाळ पर्यंत पावसाची रिप रिप सुरूच होती.धारूर येथील वाण नदीच्या पुलावरून पाणी वाहत असतानाही चार चाकी व ऑटो वाहून गेल्याने यात एकाचा मृत्यू झाला असून अन्य एकाचा शोध प्रशासनाकडून घेतला जात आहे.



धारूर तालुक्यातील वाण नदीला आलेल्या पुरामुळे पुलावरून वाहणा-या पाण्याचा अंदाज न आल्याने रुई येथील पुलावरून ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

# गणपती बाप्पा तुमचे स्वागत आहे पण.....

**भाग -१**

**सुभाष चौरे**

**पुणे-बीड । राज्यासह देशभरात गणरायाचे मोठ्या थाटामाटात आगमन झाले त्यातही पुण्यामध्ये पारंपारिक पद्धतीने गणरायाचे स्वागत केले गेले. हा आनंद गणेश भक्तांना मोठा आहे, पण त्यात बुद्धिदेवताचे स्वागत करताना कधी कधी आमच्या अडचणीही त्यांच्या कानावर घातल्या पाहिजेत. शेतकरी, नोकरदार, कष्टकरी, बेरोजगार, शिक्षण, आरोग्य, देश व राज्यातील राजकीय घडामोडी यासह अनेक प्रश्न भक्तांच्या डोक्यात आहेत. ते सुटणार कधी? आपण तर बुद्धीदेवता आहात, चांगले काम करण्याची बुद्धी सरकार, विरोधी पक्ष, स्थानिक नेत्यांना बाप्पा आता तुम्हीच द्यावी म्हणून आम्ही या माध्यमातून गऱ्हाणे मांडत आहोत.**

गणपती बाप्पा आपण बुद्धीदेवता आहात कोणतेही काम सुरू करायचे असेल तर आपली पूजा आराधना हा भोळा भक्त सुरुवातीला करतो त्यामुळे आमचा मानस असा होतो की हे काम नक्कीच यशस्वी होणार. बाप्पा आपण वर्षभरातून आमच्या भेटीला एक वेळ येतात तेही दहा दिवस. या दहा दिवसात आम्ही तुम्हाला वर्षभरातले कसे काय सांगू शकणार ? असो, पण मोजके आणि महत्त्वाचे प्रश्न गणपती बाप्पा तुमच्या कानी घालत आहोत. कदाचित आपले मूषकराज ते काही वाढवून सांगतील पण जनतेच्या भल्यासाठी सांगतील याची तुम्हाला खात्री असेल, कारण आजकाल राजकीय नेते आपल्या पीएचेच ऐकतात. ते काय सांगतात हे कोणालाच ठाऊक नसते. पण मूषक आज आपल्या चांगल्या आणि भक्तांच्या हिताच्या गोष्टी सांगतील यात शंका नाही. म्हणतात ना चहापेक्षा कॅटली गरम असं होऊ नये एवढीच अपेक्षा.

आज राज्यातल्या आणि देशातल्या शेतकऱ्यांवर मोठी संकटे आहेत. हा शेतकरी कोणत्या ना कोणत्या दुष्टचक्रात अडकला जातो. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळजन्य परिस्थिती यामुळे शेतकऱ्यांना हाताशी आलेले पीकही घेता येत नाही. आज राज्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. माझ्या बळीराजांनी पोटाला चिमटा घेऊन उभे केलेले पीक या पावसात वाहून जाताना देव बाप्पा तुम्ही पाहिलेच असेल. तुमच्या डोळ्यात पाणी येत असेल पण तुम्ही तरी काय करणार, निसर्ग ◀◀ पान २ वर



अग्रलेख

# बिहार निवडणुकीवर सगळ्यांचेच भवितव्य

बिहारमध्ये वादग्रस्त ठरू पाहणारा मतदार याद्यांच्या पडताळणीचा मुद्दा घेऊन काँग्रेसचे सर्वच नेते आंदोलन करत आहेत किंवा जाहीर सभा घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा सातत्याने गेल्या काही महिन्यांमध्ये बिहारवर लक्ष केंद्रित केले आहे. पहलगाम हल्ल्याच्या कालावधीतही त्यांनी काही घोषणा बिहारमधील एका व्यासपीठावरून केल्या होत्या. त्यानंतर गेल्या महिन्यामध्ये बिहारमध्ये एका जाहीर सभेमध्ये त्यांनी प्रत्यक्षपणे बिहार विधानसभेचे रणशिंगही फुंकले होते. एकीकडे सत्ताधारी भाजप आघाडी आणि दुसरीकडे विरोधकांची इंडिया आघाडी अशा प्रकारे कार्यरत झाली असताना तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातूनही बिहारमध्ये लक्ष केंद्रित केले जात आहे.

राजकीय रणनीतिकार प्रशांत किशोर यांनी आपल्या जनसुराज्य या संघटनेच्या माध्यमातून बिहारमध्ये चळवळ सुरू केली आहे. सध्या बिहारमध्ये भाजप आणि जनता दल युनायटेड यांचे संयुक्त सरकार असल्यामुळे विविध प्रकारच्या योजनांची घोषणा करून मतदारांना आकर्षित करण्यासाठीही मुख्यमंत्री नितीश कुमार सातत्याने प्रयत्न करत आहेत. नितीश कुमार यांनी बिहारसाठी नव्या औद्योगिक धोरणाची घोषणा केली. बिहारमध्ये औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्यांना मोफत जमीन आणि व्याजामध्ये सवलत अशा काही आकर्षक घोषणा नितीश कुमार यांनी केल्या. एकीकडे नितीश कुमार अशा प्रकारे आपले सरकार काम करत आहे म्हणून आपल्याला परत संधी द्यावी, अशा प्रकारे भूमिका मांडत असताना राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव आणि काँग्रेसचे राहुल गांधी व इतर नेते सातत्याने नितीश कुमार सरकार किती अकार्यक्षम आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न करत आहेत. कोणतीही निवडणूक असली तरी अशा प्रकारची रणनीती दोन्ही बाजूनी वापरली जात असली, तरी यावेळी बिहारची निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्वांनीच या ऑपरेशन बिहारला विशेष महत्त्व दिले आहे. एकतर नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडने केंद्रातील मोदी सरकारला पाठिंबा दिल्यामुळे मोदी सरकार बहुमतात आहे. या पार्श्वभूमीवर जर विधानसभा निवडणुकीत नितीश कुमार यांना यश मिळाले नाही, तर विरोधी पक्षांची बाजू भक्कम होईल आणि मोदी सरकारलाही अप्रत्यक्षपणे धक्का बसू शकतो याची कल्पना विरोधी पक्षांना असल्यामुळेच त्यांनी बिहार विधानसभा निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव यांनी अतिशय चांगली कामगिरी केली होती. यावेळी त्यांना त्यापेक्षा जास्त चांगली कामगिरी करून सत्तेवर येण्याची अपेक्षा आहे. काँग्रेस आणि इतर पक्षांचे पाठबळ लाभले, तर हा चमत्कार होऊ शकतो याची कल्पना त्यांना आहे म्हणूनच तेजस्वी यादव यांचा पक्षही या निवडणुकीसाठी चांगलाच जोर लावत आहे.

नितीश कुमार यांना भारतीय जनता पक्ष, चिराग पासवान यांची लोक जनशक्ती पार्टी, जितनराम मांझी यांचा पक्ष आणि कुशवाह यांचा पक्ष यांचे समर्थन लाभले आहे. त्यामुळे सध्या तरी बिहार विधानसभेचे चित्र अत्यंत चुरशीचे दिसत आहे. मोक्याच्या क्षणी जी आघाडी बाजी मारेल त्याच आघाडीला सत्ता मिळेल असेच चित्र सध्या दिसत आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दूरदृष्टीचा विचार करून जातीवर आधारित जनगणना केली होती. त्या निर्णयाचा फायदा त्यांना होईल असेही काही राजकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या व्यतिरिक्त हातात सत्ता असल्याने ऐन निवडणुकीच्या तोंडावर विविध प्रकारच्या घोषणा करून मतदारांना आकर्षित करण्याची रणनीतीही वापरली जाणार आहे. तब्बल २० वर्षे मुख्यमंत्रिपद उपभोगलेल्या नितीश कुमार यांना निवडणुकीचे राजकारण कसे खेळायचे याची संपूर्ण कल्पना असल्याने विरोधी पक्षांसाठीही नितीश कुमार यांना हरवणे हे एक मोठे आव्हान ठरणार आहे. ज्याप्रकारे राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांची आघाडी एकदिलाने काम करत आहे आणि मतचोरीचा आणि मतदार याद्यांच्या पडताळणीचा विषय मतदारांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहे, ते पाहता निवडणूक अत्यंत चुरशीने लढली जाणार यात शंका वाटत नाही. भविष्यातील अनेक राजकीय समीकरणे या निवडणुकीच्या भवितव्यावर अवलंबून असल्याने हे 'ऑपरेशन बिहार' सर्वांसाठीच महत्त्वाचे ठरणार आहे.

# राजधर्माचे पालन करा आणि मराठा आरक्षणाची घोषणा करा-सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

**सरकारने ठरवले तर पाच मिनिटात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागू शकतो पण सरकार ते करत नाही. भारतीय जनता पक्ष व देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला दिलेले आश्वासन पाळावे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे. राज्यात प्रचंड मोठे बहुमत असून त्यांनी दिल्लीत जाऊन आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी. राजधर्माचे पालन करत तातडीने मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा करावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.**



टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील समाजासह मुंबईत पोहचत असताना सरकारने या आंदोलनात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. केवळ एक दिवसाची परवानगी दिली ती हास्यास्पद असून तीन महिन्याआधी आंदोलनाची घोषणा केली होती तर सरकार एवढे दिवस काय झोपा काढत होते का? पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, काँग्रेस आघाडी सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले होते. महाराष्ट्र विधिमंडळात भाजपा युती सरकारच्या काळात मराठा आरक्षणाचा ठराव पास केला त्याला काँग्रेस पक्षाने पाठिंबा दिला होता. सत्तेत येताच ७ दिवसात मराठा आरक्षण देतो अशी भीमगर्जना देवेंद्र फडणवीस यांनी केली होती त्याचे काय झाले? धनगर समाजाला मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत आरक्षण देण्याचे आश्वासन फडणवीसांनी दिले होते, त्याचे काय झाले? 'सागर' बंगल्यावर मंथन करून, अमृत पिऊन विष मात्र समाजावर व विरोधी पक्षावर टाकण्याचे पाप फडणवीस व भाजपा करत आहे. फोडा व राज्य करा या इंग्रजांच्या नितीप्रमाणे भाजपा व फडणवीस काम करत आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना नवी मुंबईत रात्रीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर शपथ घेऊन गुलाल उधळला होता, त्याचे काय झाले? या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. आज जे तीन पक्ष सत्तेत आहेत तेच त्यावेळीही सत्तेत होते असे ते म्हणाले.

# तोतया पोलिसांनी हात चालाकी करून दोन तोळे सोन्याच्या अंगठ्या काढून पितळाच्या दिल्या

अंबड । प्रतिनिधी

२ भामट्यांनी रस्त्यात अठवून आपण पोलीस असल्याचे सांगत शेतकऱ्याच्या हातातील सोन्याच्या २ अंगठ्या काढून घेत त्याऐवजी पितळाच्या २ अंगठ्या हाती देवून पळून गेले. हा प्रकार अंबड-जालना रोडवरील विघ्नेश जिनींगजवळ घडला असून, परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी पोलीस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, बळीराम तुळशिराम जिगे (वय ७२, रा. मठपिंपळगाव, ह. मु. शेवगा पाटी) यांची शेती मठपिंपळगाव शिवारात असून, ते रोज शेवगा पाटी येथून



मोटारसायकलने शेतात ये-जा करतात. काल ते नेहमीप्रमाणे मोटारसायकलने जात असतांना विश्लेश जिनिंगजवळ दोघा अनोळखी भामट्यांनी हात दाखवून थांबवण्याचा ईशारा केला. त्यामुळे श्री. जिगे हे मोटारसायकल थांबवून खाली उतरले असता त्या दोघांनी आम्ही पोलीस असल्याचे सांगितले आणि काल या रोडवर एका शेतकऱ्याला अडवुन धोरी करण्यात आल्यामुळे तुम्ही तुमच्याकडील सोने, पैसे व्यवस्थीत खिशात ठेवा, अशा सुचना दिल्या, त्यामुळे श्री. जिगे यांनी आपल्या हाताच्या बोटातील २ तोळे सोन्याच्या २ अंगठ्या काढून खिशात ठेवल्या असता त्यातील एका भामट्याने त्या अंगठ्या मी कागदात व्यवस्थीत गुंडाळून देतो, असे म्हटल्याने श्री. जिगे यांनी दोन्ही अंगठ्या खिश्यातून काढून त्याच्या हातात दिल्या. यावेळी त्या भामट्याने हातचलाखीने स्वत कडील पितळाच्या २ अंगठ्या कानदात गुंडाळून श्री. जिगे यांच्या हातात टेकवून तेथून मोटारसायकलने धुम ठोकली. त्यानंतर श्री. जिगे यांनी सदरचा कागद उघडून पाहिला असता सव्वादोन तोळ्याच्या सोन्याच्या २ अंगठ्या त्या भामट्यांनी स्वतःबरोबर नेल्या आणि त्या बदल्यात पितळाच्या अंगठ्या कागदात गुंडाळून दिल्याचे श्री. जिगे यांच्या लक्षात झाले. त्यांनी तात्काळ मोटारसायकलने त्यांचा पाठलाग केला. परंतु भामटे पळून जाण्यात यशस्वी झाली.

## के. एस. के. च्या 'द लास्ट बॅटल' एकांकिकेची नाट्यपरिषद करंडक च्या अंतिम फेरीसाठी निवड

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद करंडक या राज्यस्तरीय एकांकिकेत स्पर्धेतील प्राथमिक फेरीमध्ये, सौ.के.एस.के.महाविद्यालय बीड, नाट्यशास्त्र विभाग तर्फे डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या प्रोत्साहनाने सादर झालेली ''द लास्ट बॅटल'' ह्या एकांकिकेची 'मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी' निवड झालेली आहे. या एकांकिकेला ''डॉ. दुष्यंता रामटेके'' यांचे मार्गदर्शन लाभले असून; त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी हि एकांकिका सादर केली होती. संदीप पाटील लिखित या एकांकिकेचे दिग्दर्शन बाळू बटुळे, संगीत- पांडुरंग शिनगारे, रंगभूषा आणि वेशभूषा - कविता दिवेकर, संगिता बनकर नेपथ्य- केशव पाटील सौरभ मोरे, प्रकाशयोजना - बाळू बटुळे, डॉ. दुष्यंता यांनी केले असून साधना विटोरे, श्रुती गायकवाड,कनिष्क बनसोडे,भागेश दाभाडे,सुमित सोळुंके,एजाज सय्यद, स्वप्नील आव्हाड, आकाश गुंजाळ, आणि अशोक मगर इ. कलावंतांनी अभिनय केला. एकांकिकेचे उत्कृष्ट आणि दर्जेदार सादरीकरण झाले. प्राथमिक फेरीमध्ये छत्रपती संभाजीनगर,बीड, माजलगाव, शिरसाळा येथील संघ सहभागी झाले होते, त्यामधून सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड नाट्यशास्त्र विभागाची ''द लास्ट बॅटल'' ह्या एकांकिकेची, बीड केंद्रातून अंतिम फेरीसाठी निवड झाली . या यशाबद्दल मार्गदर्शक डॉ. दुष्यंता रामटेके आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी बाळू बटुळे, पांडुरंग शिनगारे, कविता दिवेकर, संगीता बनकर व सहभागी कलावंतांचे , नाट्य परिषदेच्या अध्यक्ष तथा संस्थेच्या सहसचिव डॉ दीपाताई क्षीरसागर, संस्थेचे सचिव डॉ योगेश क्षीरसागर, संस्थेच्या सदस्य डॉ. सारिकताई क्षीरसागर, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील , संस्थेचे प्रशासकीय अधिकारी. डॉ.व्ही.टी देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. सिद्धार्थ जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ काकडे, पर्यवेक्षक डॉ. कोळेकर , प्रा. विजयकुमार राख, डॉ. असलम शेख आणि महाविद्यालया तर्फे अभिनंदन करण्यात आले आणि अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आरक्षणासाठी जाणाऱ्या बांधवांनी स्वस्त पेट्रोल डिझेल योजनेचा लाभ- खुर्शीद आलम

**ही योजना महेश शिंगण यांनी कालिका हायवे सर्विस नेकनुर येथुन सुरू केली आहे**




बीड । प्रतिनिधी

मराठ्या बांधवांना आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मा.जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आरक्षणासाठी शेवटच्या आंदोलन म्हणून दि.२९ रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर आरक्षण आंदोलन चे नियोजन करण्यात आले आहे, सदर आंदोलनाला गोर गरीब बांधव आपले सर्व छोटे मोठे व्यवसाय बंद करून मुंबईत जाणार आहेत, मराठा समाजाच्या आरक्षणाला आपलेही हातभार लागावे या हेतूने फुल नाही तर फुलाची पांकळी म्हणून बीड येथील जाणता राजा युवा मंच चे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक महेश शिंगण यांनी त्यांचे नेकनुर येथील कालिका हायवे सर्विस या पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेल भरणाऱ्या प्रत्येक वाहनाला सलग २७,२८,२९ पर्यंत आरक्षणाला जाणाऱ्या प्रत्येक वाहनाला प्रति लिटर दोन रुपये प्रमाणे कमी दराने पेट्रोल डिझेल देण्याचे नियोजन करण्यात आले असून या योजनेचा उद्घाटन दि.२६ ऑगस्ट रोजी बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी खुर्शीद आलम यांनी सर्व बांधवांना लाभ घेण्याचे आवाहन केले आहे, यावेळी महेश शिंगण म्हणाले की नेकनुर येथील माझ्या पेट्रोल पंपावर प्रत्येक वाहनाला पेट्रोल डिझेल प्रति लिटर दोन रुपये कमी दराने तीन दिवसासाठी मिळेल याच्या लाभ सर्व मराठा सह सर्व समाज बांधवांनी बांधवांनी घ्यावा असे आवाहन केले आहे.

# विवाहीतेला विष पाजून मारल्याची तक्रार

बीड । प्रतिनिधी

**एका २८ वर्षीय महिलेला काल अत्यावस्थ अवस्थेत जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यानंतर प्रकृती जास्तच खालावल्याने त्यांना एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतांना आज पहाटे २ वाजण्याच्या सुमारास महिलेचा मृत्यू झाला. दरम्यान माहेरहून दहा लाख रूपये घेऊन ये अशी मागणी करत**



**सासरच्या लोकांनीच विष पाजून मुलीला मारल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या संदर्भात दुपारी उशिरापर्यंत नातेवाईकांनी जिल्हा रूग्णालयात गर्दी केली होती.**

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील करिश्मा सचिन सांगळे (वय २८ ह.मु.बावी ता.शिरूर) या महिलेचा आज पहाटे खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असतांना मृत्यू झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रूग्णालयात आणण्यात आला होता. दरम्यान चार वर्षापुर्वी करिश्माचे लग्न झालेले होते. तिला दोन वर्षांची मुलगी आहे. मात्र सासरचे लोकं गेल्या अनेक वर्षांपासून माहेरहून दहा लाख रूपये घेऊन असे म्हणत तिचा छळ करत होते. त्यामुळेच सासरच्या लोकांनी तिला विष पाजले असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

## पान १ वरून...

### कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे

८ ते १० टक्के ओलावा असलेला कापूस हवा असतो. एवढ्या ओलाव्याचा कापूस त्यांना जानेवारीपर्यंत मिळणे शक्य नाही.

----------

### जुन्नरजवळ मराठा

अटॅक आला. मी याबाबत अजूनही माहिती घेत आहे. परंतु ही घटना अत्यंत दु:खद आहे. याला जबाबदार फडणवीस साहेब आहेत. तुम्ही आता जर का आम्हाला आरक्षण दिले तर आमचे बळी जाणार नाहीत. आमचे आणखी दोन बळी घेतले आहेत. लातूरला परवाच्या दिवशी अशीच घटना घडली आहे. आज देखील अशीच घटना घडली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

------------

### शिवनेरीवर नतमस्तक होवून मराठ्यांचा

पाटील आणि विकास शिंदे हे तीन जण जखमी झाले आहेत. अपघातातील सर्व जखमी सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले आहेत. दुसरीकडे मराठा आंदोलकांनी एलिव्हेटेड ईस्टर्न फ्रीवेच्या खाली मिळेल तिथे वाहने पार्क करायला सुरूवात केल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे, रात्रीतून आंदोलकांची गर्दी वाढेल असा अंदाज आहे.

------------

### मराठा समन्वयकांना

आंदोलनाच्या समर्थनार्थ विविध जिल्ह्यातून हजारो मराठा बांधव मुंबईकडे रवाना झाले आहेत. त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या मराठा समन्वयकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. अनेक पोलीस ठाण्यातून नोटीसा बजावण्यात आल्या असून, पोलिसांकडून ४० सूचना देण्यात आल्या आहेत.

----------

### धस-मुंडे वादाची किनार :

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा अल्पशः मतांनी पराभव झाला. ज्या आष्टी -पाटोदा -शिरूर मतदारसंघातून लोकसभेला भाजपाला ५० हजाराच्या पुढे मताची लीड मिळत होती यावेळी मात्र ती कमी झाली असली तरी मराठा आरक्षण हा मुद्दा होता, त्यामुळे भाजपाला फारसे मते मिळाली नाही. विशेषतः या ठिकाणी भीमराव धोंडे आणि सुरेश धस हे दोन मातब्बर नेते असतानाही मतांची आघाडी भाजपाला मिळाली नाही आणि इथूनच पुढे धस आणि मुंडे समर्थकांत धुसफूस झाली. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाकडून आमदार सुरेश धस हे उमेदवार असताना भाजपाचे दुसरे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी बंडखोरी करत निवडणूक लढली मात्र सुरेश धस मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. या निवडणुकीमध्ये मुंडे समर्थकांनी बंडखोर भीमराव धोंडे यांचा प्रचार केल्याचा थेट आरोप सुरेश धस यांनी निकाल लागून काही तास झाले असतांनाच केल्यामुळे वातावरण अधिकच तापले आणि मुंडे आणि धस यांच्यामध्ये वैचारिक मतभेद सुरू झाले. त्यानंतर मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत घेतलेल्या कार्यक्रमात पंकजा मुंडे यांचे नाव आमदार धस यांनी कार्यक्रम पत्रिकेमध्ये टाळले होते मात्र दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर पंकजा मुंडे यांचे नाव निमंत्रण पत्रिकेत घेतले गेले त्यामुळे पक्षात मुंडे यांचा दरारा कार्यकर्त्यांना दिसून आला. भाषणात देखील धस- मुंडे यांच्यातील मतभेद दिसून आले. त्यानंतर भाजप जिल्हाध्यक्ष पदासाठी आ. धस यांनीही प्रयत्न केले मात्र पंकजा मुंडे यांनी आष्टी तालुक्यातील भाजपाचे कट्टर संघ समर्थक आणि मुंडे समर्थक शंकर देशमुख यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यामुळे आ. धस यांची नाराजी अधिकच वाढली. पुढे भाजपाच्या जिल्ह्यातील कार्यकारणी मध्ये देखील पंकजा मुंडे यांचे वर्चस्व दिसून आले. विशेषतः आष्टी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडीमध्ये समर्थकांना टाळून बंडखोरी करणारे भीमराव धोंडे समर्थकांची वर्णी लागली त्यामुळे धस यांची नाराजी अधिकच वाढली, परंतु त्यांनी अद्याप बोलून दाखवली नाही. विरोधक पक्षातील असले तरी धोंडे समर्थकांना दिलेले पक्षातील प्रमोशन हे आमदार धस यांना न पटण्यासारखेच आहे. त्यामुळे आता या निवडीला धस - मुंडे वादाची किनार जरी असली तरी भविष्यामध्ये ही दरी आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमध्ये काय चित्र असेल हे काळच ठरवेल, परंतु तेथेही बंडखोरीचे चित्र पहावयास मिळेल हे मात्र नाकारता येणार नाही.

-------

### शक्तिपीठ महामार्गासाठी

दिसून येत आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की प्रकल्पावर कोणताही अंकुश येऊ देणार नाही. या भूसंपादनासाठी तब्बल २० हजार ७८७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच, विरोधाच्या गदारोळाकडे कानाडोळा करत सरकारने हा महामार्ग साकारण्यासाठी निधीची मोठी तरतूद केली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाचा आदेश पारित केला आहे. मात्र कोल्हापूरला भूसंपादनाच्या आदेशातून वगळले आहे. कोल्हापूरकरांचा विरोध पाहता केवळ वर्धा ते सांगली जिल्ह्यापर्यंतच्या भूसंपादनाला मान्यता देण्यात आली आहे. भूसंपादनासाठी २० हजार ७८७ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. विरोध डावलत सरकारचे शक्तिपीठ महामार्गाच्या दिशेने पहिले पाऊल टाकल्याचे यातून दिसून येत आहे. कोल्हापूरकरांचा आवाज काही अंशी ऐकला गेला, पण प्रकल्प रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, हे सरकारने दाखवून दिले आहे. कोल्हापूरकरांना आत्ता सुटकेचा श्वास मिळाला असला तरी पुढे सरकार त्यांचा विरोध फोल ठरवत हा प्रकल्प पूर्ण करणार, याची चिन्हे स्पष्ट आहेत. विरोध डावलून सरकारने घेतलेलं हे पहिले पाऊल म्हणजे शक्तिपीठ महामार्गाला दिलेला हिरवा कंदीलच आहे. आता हा महामार्ग प्रत्यक्षात कधी आकार घेतो, याकडे राज्यभरातील जनतेचे डोळे लागले आहेत.

----------

### वाण नदीला पूर; दोघेजण

चार चाकी वाहनातून जात असताना माजी सरपंच नितीन कांबळे हे वाहनासह वाहून गेले.त्यांचा मृतदेह काही अंतरावर असलेल्या बंधा-यात आढळला.दुस-या घटनेत आवरगाव येथील पुलावरून देखील पाणी वाहत असताना अनिल लोखंडे याने आपला रिक्षा या पुलावरून पलीकडे नेण्याचा प्रयत्न केला असता लोखंडे हे रिक्षासह वाहून गेल्याची घटना घडली.दरम्यान त्यांचा रिक्षा काही अंतरावर आढळून आला. चालकाचा प्रशासनाकडून शोध सुरू आहे.

------------

### प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक

जालना, नांदेड, लातूर आणि परभणी येथे आहेत. बीड जालन्याला तर परळी परभणीला जोडलेले आहे. बीडला प्रदूषण नियंत्रण मंडळाचे स्वतंत्र उप प्रादेशिक कार्यालय असावे अशी उद्योजकांची मागणी आहे, त्यानुसार ना. पंकजाताई मुंडे यासाठी प्रयत्नशील असून बीडचे कार्यालय प्रस्तावित आहे.

**उपप्रादेशिक अधिकारी दर बुधवारी बीड मध्ये**

स्वतंत्र कार्यालय होईपर्यंत जिल्हयातील औद्योगिक व उद्योगांशी संबधित समस्या हाताळण्यासाठी एखादा उप प्रादेशिक अधिकारी असावा अशी उद्योजकांची मागणी होती, त्यानुसार ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पर्यावरण विभागाला तातडीने निर्देश दिले. यासंदर्भात छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी मनिष होळकर यांनी परिपत्रक काढले असून बीड येथील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील असे म्हटले आहे.

------------

### गणपती बाप्पा तुमचे स्वागत आहे पण.....

कोपतोय असेच म्हणावे लागेल. पण त्याला आधार देणारी दुसरी यंत्रना आहे तुम्हीच तयार केलेली. देवबाप्पा तुम्ही सरकार म्हणून निर्माण केली आहे पण या सरकार विषयी तुम्हाला आम्ही काय सांगणार, हे तुम्हालाच अधिक माहित आहे. कधी म्हणतात शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ तर कधी कधी त्याच्याकडे कानाडोळा करतात. निवडणुकात मात्र शेतकऱ्यांना खुश करणारे आश्वासने दिली जातात अन निवडणुका संपल्या की ते विसरून जातात. मग गणपती बाप्पा बुद्धीदेवता तुम्हीच आहात मग अशावेळी या नेत्यांची बुद्धी कुठे जाते हा भाबडा प्रश्न तुमच्याच भक्तांना पडला आहे. कधी आमच्या बळीराजाचा प्रमुख असलेला कृषिमंत्री घोटाळ्यात अडकतो तर कधी सभागृहात आमच्या प्रश्नावर आवाज उठवण्याऐवजी राजाराणी आणि जोकर याची पेरणी करताना दिसतो. एकीकडे जुगारावर बंदी असते आणि दुसरीकडे सर्वोच्च सभागृह ते खेळत बसतात. हा सगळा खेळ राज्यातील बळीराजाचा त्यांनी मांडला असेच म्हणावे लागेल. मग तुम्ही त्यांना चांगली बुद्धी कधी देणार, प्रचंड अडचणी असतानाही जगाचा हा पोशिंदा कधीच सुखी आणि समाधानी झालेला दिसत नाही. पोटाला चिमटा घेऊन घेतलेले पिक कधी पाऊस न पडल्याने दुष्काळात गेले तर कधी अतिवृष्टीमुळे पाण्याखाली गेले त्याला जबाबदार गणराया तुम्हीच आहात असा आमचं समज झाला आहे, पण त्याचा दुसरा मार्ग ज्यांना तुम्ही सत्तेवर बसवलं त्यांना किमान मदतीची बुद्धी द्यावी म्हणजे आम्हालाही तुमच्या उत्सवांमध्ये आनंदाने नाचता येईल. देवबाप्पा हा विषय फक्त माझ्या बळीराजाचा आहे. त्यांना भेट द्या, न्याय देण्यासाठी राज्यकर्त्यांना सुबुद्धी द्या, एवढीच माफक अपेक्षा. आणखी बरेच प्रश्न आहेत, आमचा पुण्याचा विस्तार आहे. महाराष्ट्रातल्या रस्त्याचा प्रश्न आहे. राजकारणात सुरू असलेले आरोप प्रत्यारोप आहेत, त्यामध्ये भरडला जातोय सर्वसामान्य माणूस. आरोग्याकडे दुर्लक्ष होते, शिक्षणाकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही, बेरोजगारी वाढते आणि नेते मात्र जातीवादात गुंतले आहेत. कधी हिंदू - मुस्लिम कधी दलित - हिंदू तर कधी मराठा - ओबीसी असे वाद निर्माण करून स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न तुम्हीच बुद्धी दिलेले राजकीय जातीवंत करताना दिसत आहेत. हे सर्व प्रश्न आता पुढच्या भागात आम्ही तुमच्या कानी घालूच, पण तोपर्यंत बळीराजाच्या या प्रश्नावर विचार करावा, एवढीच बप्पा तुमच्या चरणी प्रार्थना.

----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात...



### संस्कार विद्यालय येथे 'दम दमा दम' नृत्य स्पर्धा संपन्न

बीड । प्रतिनिधी

संस्कार विद्यालय येथील श्री गणेश चतुर्थी निमित्त दम दमा दम दम सांस्कृतिक नृत्य स्पर्धा घेण्यात आले, यामध्ये तिसरी व चौथी च्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवण्यात आला होता आज तिसरी वर्गातील अनुजा विशाल वडमारे हिने उत्कृष्ट नृत्य केल्याबद्दल मुख्याध्यापिका , प्राध्यापक यांनी अनुजा चे कौतुक केले, सर्व स्पर्धक विद्यार्थी विद्यार्थ्यांचे कौतुक केले, नृत्य स्पर्धा हे मोठ्या उत्साहात संपन्न झाले यावेळी, शाळेचे, श्रीमती कुलकर्णी एस डी मुख्याध्यापिका

श्री. गिरी एस डी विभाग प्रमुख तिसरी चौथी विभाग,श्रीमती जाधव एम ए,श्रीमती सौंदत्तीकर एस बी,श्रीमती पाठक व्ही आर,श्रीमती मगर व्ही व्ही,श्रीमती मोराळे एस ए,श्रीमती ठाकूर व्ही पी,श्रीमती पानखडे व्ही आर,श्री.वळवी आर जी,श्रीमती साळुंके जे बी,श्री.कांबळे ए.एल,श्रीमती काळे एस पी,श्रीमती माने एस डी,श्रीमती कौंढाण्य,यांच्या उपस्थितीत नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



**पाटोदा – मिशन माणुसकी फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सय्यद शफाऊद्दीन (शप्पुसेठ) यांची अखिल भारतीय पसमंदा समाज सेवा संघटनेच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मिशन माणुसकीच्या वतीने सत्कार करुन अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आले.यावेळी दिपकजी वैद्य, प्राचार्य श्रीकांत निशिगंध, पत्रकार सतिश गर्जे, हमीदखान पठाण, जावेद शेख,फय्युम सेठ, पत्रकार सचिन शिंदे, उपस्थित होते.**

### सिंदफणा अर्बन मध्ये श्रीगणेशाचे आगमन



शिरूर कासार । प्रतिनिधी

गणरायाचे सर्वत्र जल्लोषात स्वागत करण्यात येत असून प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी सिंदफणा अर्बन मधे श्रीगणेशाचे आगमन झाले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा संस्थापक आजीनाथ गवळी यांचे हस्ते श्रीगणेशाची स्थापना करण्यात आली.यावेळी त्यांनी सर्व खातेदारांसह गणेशभक्ताना शुभेच्छा दिल्या.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा संस्थापक आजीनाथ गवळी यांचेसह बँकेचे स्थानिक सल्लागार सदस्य जेष्ट पत्रकार गोकुळ पवार,पत्रकार सतिष मुरकुटे,संपादक प्रकाश साळवे,व्यवस्थापक राम सुरे,देविदास नेटके,योगेश मंचरे,प्रकाश काशिद,यूवराज काशिद,किशोर आंधळे,अमोल पाखरे,गोकुळ चाटे,सटलेमामा,कैलास गायके,कैलास दौंड,कु.योगीता गवळी,महेश बनकर आदींची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दर बुधवारी बीड येथे उपलब्ध होणार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील. असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.


# नाथापूरच्या अपात्र सरपंचाकडून अपहारीत रक्कम व्याजासह वसुल करण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

**ग्रामसभा न घेणे, गाळे वाटप व इतर प्रकरणात आर्थिक अनियमितता करून अपहार करणे यांसह विविध प्रकरणांबाबत बळवंत चव्हाण यांनी केलेल्या तक्रार अर्जावर विभागीय आयुक्त यांनी सुनावणी घेऊन कलम ३९ (१) नुसार नाथापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांना अखेर अपात्र घोषित केले आहे. यापूर्वी बळवंत चव्हाण यांच्या तक्रारीवरून त्यांचे सासरे मदन चव्हाण यांना जि.प.सदस्य म्हणून अपात्र केले होते. यापूर्वी सासरा आणि आता सुन दोघांनाही अपात्र केल्यामुळे नाथापूर पंचक्रोषीत या प्रकरणाची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. विभागीय आयुक्तांनी नाथापूर ग्रामपंचायतमध्ये झालेल्या अनियमितता व आर्थिक गैरव्यवहारातील अपहारीत रक्कम व्याजासह वसुल करण्याचेही आदेश केले आहेत.**

माहे डिसेंबर २०२२ मध्ये मयुरी सुंदर चव्हाण यांची नाथापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी जनतेतून निवड झाली होती. त्यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळात त्यांनी नियमानुसार ग्रामसभेची नोटीस न काढणे, अवैध ग्रामसभा घेणे, वेळेवर ग्रामसभा न घेणे, गाळे वाटपात आणि त्यांचा किराया वसुल करण्यात आर्थिक अपहार करणे, ग्रामपंचायत अधिनियमांचे व लेखासंहितांचे उल्लंघण करणे, मागासवर्गीयांच्या विकासासाठी राखीव १५% टक्के निधी अखर्चित ठेवणे यांसह विविध गैर प्रकारांबाबत सबळ पुराव्यासह तक्रार सामाजिक कार्यकर्ते बळवंत चव्हाण व महादेव गिराम यांनी केली होती. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांच्या विरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) नुसार हे प्रकरण





दाखल करण्यात आले होते. यामध्ये बळवंत चव्हाण यांच्यावतीने ॲड.विलास भुतेकर व ॲड.वैभव कुलकर्णी आणि महादेव गिराम यांच्यावतीने ॲड.नाईकवाडे व ॲड.खांडे यांनी काम पाहिले. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तक्रारदार बळवंत चव्हाण यांच्या तक्रारीतील प्रत्येक मुद्यांची चौकशी करून स्वयंस्पष्ट अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयात दाखल केला होत. या अहवालात नाथापूर ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता, महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ चे पालन न करणे आणि सरपंच यांनी केलेल्या अनियमितता व गैरवर्तणाबाबत स्पष्ट उल्लेख झाला होता. या अहवालासह विविध पुरावे तक्रारदाराच्या विधिज्ञांनी सुनावणी दरम्यान विभागीय आयुक्त यांच्यासमोर सादर केले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी या प्रकरणात दि.१८ ऑगस्ट रोजी अंतिम आदेश पारीत केले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) चे उल्लंघण केल्यामुळे नाथापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांना विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी अपात्र घोषीत करून त्यांचे सरपंच पद रद्द केले आहे. त्याचबरोबर या प्रकरणातील अपहारीत रक्कम व्याजासह वसुल करण्यासाठी विशेष समिती नेमून कार्यवाही करण्याचे आदेश सुध्दा विभागीय आयुक्त यांनी दिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते बळवंत चव्हाण यांनी यापूर्वी विद्यमान सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांचे सासरे मदनराव चव्हाण हे जिल्हा परिषद सदस्य म्हणून कार्यरत असताना त्यांचे विरुध्द सबळ पुराव्यासह तक्रार केली होती. बळवंत चव्हाण यांच्या तक्रारीमुळे मदन चव्हाण यांना जिल्हा परिषद सदस्य म्हणून अपात्र करण्यात आले होते. उच्च न्यायालयाने सुध्दा याप्रकरणात बळवंत चव्हाण यांच्या बाजूने आदेश दिले होते. आता पुन्हा सरपंच मयुरी चव्हाण या अपात्र झाल्यामुळे नाथापूर व पंचक्रोषीमध्ये या न्यायनिवाड्याची मोठ्या चर्चा होत आहे.

# गणपतीबाप्पा शेतकरी, कष्टकऱ्यांना सुखी ठेव -फुलचंद कराड

### नाथनगर गणेश मंडळाच्या श्रीची कराड यांच्याहस्ते स्थापना

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी,कष्टकरी सध्या मोठ्या अडचणीत सापडलेला असुन गणपतीबाप्पा शेतकरी व कष्टकर्यांच्या जीवनात सुख समाधान आणुन त्यांना सुखी ठेव असे साकडे भगवान सेनेचे सरसेनापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांनी केले.कराड यांच्या हस्ते नाथनगर गणेश मंडळाच्या श्री ची स्थापना करण्यात आली यावेळी ते बोलत होते.



परळी शहरात दि.२७ ऑगस्ट रोजी श्रीगणेशाचे मोठ्या उत्साहात आगमन झाले.परळी शहरातील प्रमुख गणेश मंडळांपैकी एक असलेल्या नाथ नगर गणेश मंडळाच्या श्री ची भगवान सेनेचे सरसेनापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते फुलचंदराव कराड यांच्या हस्ते स्थापना करण्यात आली. यावेळी बोलताना फुलचंदराव कराड म्हणाले की,यावर्षी निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी मोठ्या संकटात आहे.सुरुवातीस कमी पावसामुळे खरीपाच्या पेरण्या खोळंबल्या,ज्या शेतकर्यांची पिके उगवली ती अलिकडील अतिपावसाने नष्ट होत आहेत तसेच मजुरांच्या हाताला काम नाही यामुळे मजुरवर्गही संकटात आहे अशा कष्टकरी जनतेला संकटातून बाहेर काढ असे साकडे कराड यांनी यावेळी गणरायाला घातले.यावेळी माऊली फड धर्मापुरीकर बळीराम मुंडे भालचंद्र बदलीवाड,माधवराव मुंडे,राठोड हडसर,महेश बदने,सुनील राठी,रोहित वाडे,नितीन ढाकणे,चाटे साहेब,विजय गायकवाड,सुरज निलंगे,हार्दिक पटेल,भावना पटेल गौरी राठोड,स्वाती बदने,सुप्रिया बेद्रे आदी गणेश मंडळांचे पदाधिकारी व गणेशभक्त उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### पोहरादेवी येथे राज्यस्तरीय भटके

सामाजिक शैक्षणिक आर्थिक सांस्कृतिक धार्मिक व राजकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.बंजारा,लबाणा सह वडार,कैकाडी,तिरमली, टकारी,नंदीबैलवाले, गोपाळ,कुरमोडेजोशी,वासुदेव,मरीआईवाले बेलदार या व इतर भटक्या विमुक्त जातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी,भटक्या विमुक्तांच्या जीवनात अमुलाग्र बदल व्हावा यासाठी पोहरादेवी येथील कार्यक्रमात अनेक ठराव पारित करून महायुती सरकारकडे रामेश्वरभाऊ नाईक व किसनभाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली सादर केले जाणार आहेत. सदरील कार्यक्रमासाठी महंत जितेंद्र महाराज,कबीरदास महाराज,सुनील महाराज, शेखर महाराज,यशवंत महाराज,राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष विलासभाऊ राठोड,राष्ट्रीय बंजारा राजकीय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा.पी.टी.चव्हाण,राष्ट्रीय महासचिव तथा भाजपचे नेते अँड.पंडित भाऊ राठोड, प्रदेशाध्यक्ष भिकणभाऊ जाधव,राष्ट्रीय प्रवक्ते मधूकरभाऊ जाठोत,डॉ. जगदिशभाऊ सकवाण,प्रदेश प्रवक्ते अमोलभाऊ पवार, ओएसडी निलेश भाऊ जाधव, युवा नेते युवराज राठोड,प्रदेश उपाध्यक्ष प्रेमकिसन राठोड यांची देखील उपस्थिती राहणार आहे. तरी सदरील भव्यदिव्य कार्यक्रमाला राज्यातील बंजारा,भटके विमुक्त समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भटके विमुक्त दिवस यशस्वी करावा,असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सातव्या वेतन आयोगाचा

वाल्मिकी, मिराबाई आलझेंडे, चंद्रकलाबाई जावळे, मिराबाई रांजवण, छायाबाई, रमेश भिसे, अक्षय गालफाडे, राजु वाल्मिकी, राजाभाऊ मिसाळ, संजय ससाणे, मळीबा ससाणे, अमोल टाकणखार, शाम राठोड, प्रकाश शिंदे, रंजित रोमन यांच्यासह इतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. ''आमची मागणी पूर्ण झाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही,'' असा ठाम इशारा कर्मचाऱ्यांनी या वेळी दिला आहे.

### सत्यशोधक मातंग समाज

महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे हे असतील. तर उद्घाटक म्हणून समाजभूषण आमदार अमित गोरखे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रवादीचे नेते रमेशराव आडसकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. राष्ट्रीय मानवी हक्क अभियान चे अध्यक्ष प्रा.मिलिंद एकनाथराव आव्हाड व वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध गायक रणजीत खंडागळे यांच्या समाज प्रबोधन बहारदार गीतांचा कार्यक्रम होणार आहे. मागील अनेक वर्षांपासून युवा नेते बाबा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंद्रुड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा अगदी भव्य दिव्य स्वरूपात साजरा होतो. यावर्षी जयंती सोबतच सत्यशोधक मातंग समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. विखुरलेल्या समाजाला संघटित करून योग्य दिशा देण्यासाठी हा मेळावा निर्णय ठरणार आहे. तरी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विशाल गवळी यांनी केले आहे.

### तलवाडा गाव तलाव

तनावपूर्ण आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. महसुल व तलवाडा ग्रामपंचायत प्रशासक गाव तलाव फुटल्यावर कुंभकर्ण झोपेतुन जागणार का आसा प्रश्न गावक-यातुन उपस्थित केला जात असुन तलाव फुटल्यास सर्वस्वी जबाबदारी तलवाडा ग्रामपंचायत ग्रामसेवक मुसळे व प्रशासक चोपडे आणि महसुल विभागाची राहिल अशी तलवाडा गाव व पंचक्रोशीतील नागरिक करीत आहे.

### नवनाथ शिराळे व शंकरराव

वैदिक मंत्राच्या जयघोषात संपन्न झाली आणि श्री गणेशाकडे सर्वांच्या वतीने प्रार्थना करण्यात आली की बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र चांगला पाऊस पडो सर्व लोक सुखाने गुना गोविंदाने नांदावे अशी प्रार्थना भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा अध्यक्ष यांच्या वतीने व उपस्थित सर्व गणेशभक्त यांच्या वतीने श्री गणराया कडे प्रार्थना करण्यात आली.

### सोलार ऊर्जेचा वापर

उपलब्ध आहेत कोळसा ते नैसर्गिक वायू हे नष्ट होणारे आहेत त्याला पर्याय म्हणून अ परंपारिक ऊर्जा स्त्रोत आपण वापरले पाहिजे त्यामध्ये सौर ऊर्जा पवन ऊर्जा यांचा समावेश होतो.या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ.सारंग जोशी, रसायनशास्त्र विभागप्रमुख,स्वा. सावरकर महाविद्यालय बीड हे होते.त्यांनी विज्ञान आणि विज्ञानात झालेल्या प्रगती याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले.विज्ञानात न केलेली जी प्रगती आहे ती मानवी कल्याणासाठी किती उपयुक्त आहे याबद्दल उदाहरणे देऊन अतिशय सोप्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विज्ञानामध्ये असलेल्या विविध शाखा आणि त्या शाखेमध्ये असलेले होत असलेले संशोधन देशातील विविध संशोधन संस्थांमध्ये कशा पद्धतीने केल्या जाते याबद्दलही सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली.या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. मुकुंद देवर्षी,महाविद्यालय अर्थ समिती अध्यक्ष एकनाथ जाधव उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना,डॉ. युवराज मुळे,प्रा . अंकुश साबळे, सायन्स फोरमचे प्रमुख डॉ.बोरगावकर विकास,डॉ.लड्डा कमलकिशोर,बेस्ट प्रॅक्टिस विभागाचे प्रमुख डॉ.एस. बी.इंगोले,डॉ. विनायक देशमुख, उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. शंकर मिटकर यांनी केले.आभार डॉ. गजानन होन्ना यांनी मानले.

# विधानसभा निवडणुकीत शिट्टीचा प्रचार करणाऱ्या महिलेला भाजपा महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष पद-सोनाली येवले

पाटोदा । प्रतिनिधी

नुकत्याच भारतीय जनता पार्टीच्या नवनियुक्त नियुक्ती जाहीर केले असून यामध्ये मुगगाव येथील असणाऱ्या सौ. सुर्वणाताई लांबरुंड यांना बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड केली असून ह्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी सिटीच्या उमेदवाराचा प्रचार सक्रिय करून बुथ एजंट होत्या. तर लोकसभेच्या निवडणुकीत ना.पंकजाताई मुंडे यांच्या वेळी प्रचारात गणात.गटात कुठे ही फिरल्या नाहीत यांच्या मुलांनी.खा.बजरंग सोनवणे यांचे पोलींग च्या चिठ्ठी वाटप करत होते तर. खा. प्रितमताई मुंडे यांच्या वेळेस ही ह्या बुथ वर नव्हत्या मी व कार्यकर्त्यांनी मिळुन भाजपाला गावात गणात.गटात फिरुन खर्च करत मतदान घेतले असून ह्या फक्त मतदान माझ्या मुळे झाले असे दाखवुन पद मिळवत असुन वरिष्ठ भाजपाने गावात येऊन चौकशी करावी नेमकं मतदान भाजपाला कोणामुळे झाले.अन वरिष्ठ भाजप मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार भिमराव धोंडे यांच्या सिटीच्या प्रचार करणाऱ्या महिलेला जिल्हा अध्यक्ष केले आहे. भाजपमध्ये नेमकं चाललंय काय याकडे वरिष्ठ भाजपने लक्ष देऊन चौकशी करावी अशी मागणी सोनालीताई येवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे याबाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या नवनियुक्त नियुक्ती जाहीर झाल्या असून यामध्ये अनेकांना. भाजपाच्या विरोधात निवडणुकीत काम केलेल्याना पद दिली आहेत. विधानसभा निवडणुकीमध्ये माजी.आ.भिमराव धोंडे यांच्या सिटीचा प्रचार केला असून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या विरोधात प्रचार करून बुथवर सिटीच्या उमेदवाराचे एजंट होणाऱ्या महिलेस भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष केले असून त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवर भाऊसाहेब अण्णा भवर गावातील कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीसाठी मोठ्या प्रमाणात मतदान घेतले असून मात्र हेच मतदान मी घेतले असे दाखवत आहे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये २०१९ मध्ये माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांच्या प्रचार यंत्रणेत ही ह्या महिला सक्रिय नव्हत्या पंकजाताई मुंडे या भाजपच्या उमेदवार खासदारकीला उभे राहिले असता यावेळेसही गावात ह्या बुथवर राहिल्या नाहीत अगर कुठे गणात. गटात फिरल्या यांचे मुलं राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार खासदार बजरंग सोनवणे यांच्या पोलिंग चिठ्ठ्या वाटप करण्यात मग्न होते तरीसुद्धा भारतीय जनता पार्टीने या भाजपच्या विरोधात सतत राहणाऱ्या व मतदानविरोधात करणाऱ्या या महिलाच भाजपाने जिल्हाध्यक्ष पद दिले कसे हे मात्र विशेष आहे याबाबत वरिष्ठ भाजपाने गावात .गणात.गटात येवुन चौकशी करून खरा अहवाल काय आहे हे पहावे मग जिल्हाध्यक्ष पद जाहीर करावी असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सोनालीताई येवले यांनी म्हटले आहे

# नागरिकांनी पावसाळ्यात सुरक्षिततेची दक्षता घ्यावी

**बीड । प्रतिनिधी**

**सद्यस्थितीत मान्सून सक्रिय असून बीड जिल्ह्यात ठिकविकाणी मुसळधार पावसामुळे नद्या, नाले, ओढे व पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरू आहे. परिणामी अनेक ठिकाणी पुलावरून पाणी वाहत असून नागरिकांकडून निष्काळजीपणामुळे अपघातांच्या घटना घडत आहेत. सदर परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत सर्व नागरिकांना खालीलप्रमाणे आवाहन व दक्षता सूचना करण्यात आल्या आहेत.**

नागरिकांनी पावसाळ्यात पुढील प्रमाणे दक्षता घ्यावी. मुसळधार पाऊस सुरू असतांना अनावश्यक प्रवास टाळावा. पुराचे पाणी पुलावरून वाहत असल्यास पूल ओलांडू नये. पुराच्या पाण्यात पोहण्याचा प्रयत्न करू नये. पाण्याच्या खोलीचा अंदाज नसेल तर पाण्यात जाऊ नये. पुलावरून किंवा नाल्यांवरून पाणी वाहत असल्यास पूर पाहण्यासाठी नागरीकांनी तेथे गर्दी करु नये, तसेच नदीकाठ, ओढ्याकाठ किंवा धोकादायक ठिकाणी सेल्फी / फोटो काढण्याचा मोह टाळावा. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्ष रहावे, नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यास नदीपात्रापासून दूर जावे. पावसाच्या वेळी मुलांना नाल्याजवळ, नदीकाठी किंवा धरण परिसरात जाण्यास परवानगी देऊ नये. धरण क्षेत्र, बंधारे व जलाशय परिसरात पाण्याचा विसर्ग होवू शकतो, त्यामुळे त्या ठिकाणी गर्दी करणे टाळावे. वीज पडत असल्यास झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबू नये. पुराच्या वेळी पाळीव प्राण्यांना बांधून ठेवू नये. सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. ग्रामपंचायत, पोलीस पाटील, तलाठी किंवा स्थानिक प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे. पावसामुळे घरात पाणी शिरण्याची शक्यता असल्यास वीजपुरवठा बंद करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, तसेच जमिनीखालून जाणाऱ्या विद्युत तारांपासून सावध राहावे.दुषित पाणी पिऊ नये, पिण्याचे पाणी उकळून प्यावे व जेवणाआधी हात स्वच्छ धुवून घ्यावे. पूर ओसरल्यानंतर परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रशासनास सहाय्य करावे व परिसर स्वच्छ ठेवावा, रोगराई पसरू नये याकरिता आरोग्य विषयक खबरदारी घ्यावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी (१०७७) त्वरित संपर्क साधावा. नागरिकांनी या कालावधीत निष्काळजीपणा टाळून आपल्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. जिल्हा प्रशासन सर्वतोपरी दक्ष आहे. मात्र आपत्ती टाळण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सतर्कता अत्यावश्यक आहे, असे शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

# अंबाजोगाई हे महाराष्ट्रातले तिसरे पुस्तकांचे गाव म्हणून जाहीर करा

### उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्याकडे गजानन मुडेगावकर, बालाजी खैरमोडे यांची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी बीड शहरात उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत हे आले असता त्यांनी अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे जाहीर केले होते. मात्र याची शासनाकडून अधिकृत घोषणा केली नाही. तर तशी अधिकृत घोषणा करावी अशी मागणी शिवसेना नेते तथा मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर व शिवसेना बांधकाम कामगार सेनेचे जिल्हा समन्वयक बालाजी खैरमोडे यांनी काल उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

अंबाजोगाई शहर हे आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, नाट्य, क्रीडा, सहकार, ग्रंथ, परिवर्तनवादी चळवळ व पर्यटनदृष्ट्या सक्षम असून लेखक, साहित्यिक व वाचन प्रेमी वर्ग या शहरात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वाचन संस्कृतीला बळ देणारे असे विविध उपक्रम वर्षभर अंबाजोगाईत असतात. अंबाजोगाई ही मराठी भाषेचे आद्य कवी मुकुंदराज, प्रकांड पंडित सर्वज्ञ दासोपंत यांची कर्मभूमी आहे. तसेच कोकणस्थांची कुलदेवता माता योगेश्वरी देवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं



गांव आहे. नैसर्गिक विविधतेने नटलेले गांव आहे. नदी, डोंगर, वनराई, पशु पक्षी यासोबतच मंदिराचे गांव म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याचे नेतृत्व ज्यांनी केले ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या लोककार्याची साक्ष देणारे हे गांव आहे. दिवंगत नेते प्रमोदजी महाजन, दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार बापूसाहेब काळदाते, माजी आमदार बाबुरावजी आडसकर, डॉ.द्वारकादास लोहिया, भगवानराव लोमटे बापू, डॉ.व्यंकटराव डावळे, रामकाका मुकादम यांच्यासह अनेक मान्यवरांनी विविध क्षेत्रात अंबाजोगाईचा लौकिक सर्वदूर केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ तिवारी, अमर हबीब, स्व.शैलाताई लोहिया, डॉ.नागरगोजे, दिनकर जोशी, दगडू लोमटे, बालाजी सुतार, मुकूंद राजपंखे, प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे, प्रा.गौतम गायकवाड, बलभीम तरकसे, विश्वांभर वराट गुरूजी, स्व.प्रा.संभाजी सावळकर यांनी अंबाजोगाई साहित्य संमेलन चळवळीला बळ दिले आहे. अशा वैविध्यपूर्ण बाबींमुळे अंबाजोगाई शहर तिसरे कवींचे गांव म्हणून उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत बीड येथे बुधवार, दिनांक १६ एप्रिल रोजी जाहीर केले होते. याबद्दल या समस्त अंबाजोगाईकरांच्या मागणीला मिळालेलं हे सर्वांत मोठं यश आहे. या करिता ही घोषणा शासनाने अधिकृतपणे करुन तात्काळ काम करावे अशी मागणी या निवेदनाद्वारे गजानन मुडेगावकर, बालाजी खैरमोडे, युवराज भोसले, संग्राम खांडेकर यांनी केली आहे.

cmyk

# शेतकऱ्यांना झटका, उद्योगांना दिलासा; कापसाबाबत सरकारचा मोठा निर्णय

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात कर लावल्याने अडचणीत आलेल्या टेक्सटाईल उद्योगाला दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने मोठं पाऊल उचललं आहे. कापड उद्योगाच्या फायद्यासाठी फक्त एका महिन्यासाठी रद्द केलेले आयात शुल्क आता आणखी तीन महिन्यांसाठी वाढवण्यात आले आहे. खरं तर केंद्र सरकारने कापूस आयातीवरील ११ टक्के शुल्क ३० सप्टेंबरपर्यंत रद्द केलं होते, मात्र आता हीच मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. म्हणजेच आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कापूस आयातीसाठी कापड उद्योगाला कोणतेही आयात शुल्क भरावे लागणार नाही. सरकारच्या या निर्णयामुळे उद्योजकांची चांदी झाली असली तरी दुसरीकडे आधीच अडचणीत असलेल्या बळीराजाला मात्र झटका बसला आहे.



या निर्णयामुळे सूत, कापड, वस्त्र आणि तयार वस्त्रांसह संपूर्ण कापड मूल्य साखळीतील इनपुट खर्च कमी होण्यास मदत होईल. यासोबतच, उत्पादक आणि ग्राहकांना आवश्यक तो दिलासा मिळेल असं सरकार कडून सांगण्यात येत आहे. डिसेंबरपर्यंत कापसावरील आयात शुल्क रद्द केल्यामुळे कंपन्या आणि निर्यातदारांना काहीसा दिलासा मिळेल. सरकारने यापूर्वी १९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत कच्च्या कापसाच्या आयातीवरील सर्व कस्टम ड्युटी तात्पुरती रद्द केली होती. देशांतर्गत बाजारात कापसाचे भाव स्थिर करणे आणि कापड उद्योगाला दिलासा देणे हाच यामागचा उद्देश होता.. आता ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देणे सरकारने म्हणजे या दृष्टीने सरकारने टाकलेलं हे मोठं पाऊल म्हणावं लागेल. आधीच शेतकऱ्यांना कापसासाठी किमान आधारभूत किंमतही मिळत नाहीये. आता कापड उद्योगाच्या दबावामुळे त्यांना अधिक नुकसान सहन करावे लागेल. कापसाचे नवीन पीक सुमारे एक महिन्यानंतर देशात येणार असताना सरकारने आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कापणीच्या वेळी बाजारभाव कमी राहिल्यास शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागू शकतो. आयात शुल्क हटवल्याने कापसाचा साठा देशात मोठ्या प्रमाणावर तयार होऊ शकतो. आणि त्याचा परिणाम देशांतर्गत कापसाच्या दरावर होऊ शकतो. जेव्हा कापड उद्योगाला परदेशातून स्वस्त कापूस मिळेल, तेव्हा भारतातील शेतकऱ्यांकडून महागडा कापूस कोण खरेदी करेल? असा सवाल आता बळीराजाकडून केला जात आहे. सरकारच्या या निर्णयामुळे कापसाच्या लागवडीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. कारण हे जर असच सुरु राहणार असेल तर मग शेतकरी कापसाची लागवड सोडून इतर पिकांकडे वळतील.

## ऊस पिकातील गवताळ वाढ रोखण्यासाठी उपाय




गवताळ वाढ हा रोग उसामधील वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये महत्त्वाची लक्षणे दर्शवितो. रोगग्रस्त उसाची प्राथमिक लक्षणे लावणीनंतर अथवा खोडव्यातील उगवून आलेल्या उसाच्या पानांवर दिसून येतात. को ४१९, को ७४०, को ७५२७, कोसी ६७१, को ९४०१२ व को ८६०३२ या जातीत या रोगाचे प्रमाण जास्त आढळते. महाराष्ट्रात या रोगाचे प्रमाण १०% पर्यंत आहे. या रोगाचा प्रसार बेण्यामार्फत व किडीद्वारे होतो.

रोगाची लक्षणे : रोगामुळे पिकाच्या सुरूवातीच्या काळात ऊस बेटात प्रमाणापेक्षा जास्त फुटवे दिसतात व बेटास गवताच्या ठोंबाचे स्वरूप येते. बेटांत फुटल्यांची संख्या कधी-कधी १०० पेक्षा जास्त आढळते. रोगामुळे उसाच्या पानामध्ये कमी प्रमाणात हरितद्रव्य तयार होते त्यामुळे पाने पिवळी किंवा पांढरी पडतात. रोगट बेटात गाळण्यालायक ऊस तयार होत नाही. रोगट उसावरील पाने अरुंद व आखूड होतात. पूर्व वाढ झालेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास, पोंग्यातील पाने पिवळी पडतात व कांड्यावरील डोळ्यातून पिवळसर पांगशा फुटतात. रोगट ऊस नंतर पोकळ होऊन वाळतो. गवताळ वाढ रोगामुळे ५ ते २० % पर्यंत ऊस उत्पादनात घट येते. खोडवा पिकात ह्या रोगामुळे जास्त प्रमाणात बेटे पिवळी पडतात व मरतात. रोगाचे प्रमाणदेखील सुरुवातीच्या काळात जास्त आढळते. रोगग्रस्त खोडवा पिकातील उसांची संख्या घटते.

रोग नियंत्रणाचे उपाय : बेणे मळ्यातील रोगमुक्त बेणे लागवडीसाठी निवडावे. बेणेमळ्यासाठी मुलभूत बेणे तयार करण्यासाठी लागवडीपूर्वी ऊस बेण्यास बाष्प-हवा प्रक्रिया यंत्राद्वारे ५४ सेंटिग्रेट तापमानास १५० मिनीटे प्रक्रिया करावी. उसाची उगवण झाल्यानंतर नियमितपणे प्रादुर्भावग्रस्थ बेणे मुळासहीत काढावीत व जाळून नष्ट करावीत. पिकाची पाहणी करून रोगट बेटे काढावीत. सामुहिक पद्धतीने बेटे निर्मुलनाचा कार्यक्रम हाती घेतल्यास रोगाचे नियंत्रण प्रभावीपणे करता येईल. बेणे छाटते वेळी कोयता अधून मधून उकळत्या पाण्यात निर्जंतुक करावा. उसावरील रस शोषण करणाऱ्या किडींचा बंदोबस्त वेळीच करावा, जेणेकरून रोगाचा प्रसार होणार नाही. रोगाचे प्रमाण २०% पेक्षा जास्त असल्यास त्या पिकाचा खोडवा घेवू नये. पिकाची फेरपालट करावी जेणेकरून रोगाचे प्रमाण पुढील पिकात कमी राहील.

## लाळ्या खुरकूत रोगाची लक्षणे आणि उपाय




शेतीला जोडधंधा म्हणून पशूपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. त्यामूळे शेतकऱ्यांना दूध व्यवसायातून चांगला नफा मिळतो. पण जनावरांचे आरोग्य चांगले असेल तर त्यांच्यापासून चांगल्या प्रतीचे दूध उत्पादन मिळते. म्हणून जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे फार गरजेचे असते. हिवाळ्यात जनावरांना लाळ्या खुरकूत आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळत आहे. हा संसर्गजन्य रोग असून प्रामुख्याने डिसेंबर पासून ते जून महिन्यापर्यंत होण्याचे प्रमाण जास्त असते. ज्या जनावरांची खूर विभागलेली असते अशा जनावरांना हा आजार जास्त होतो.या रोगाचा प्रसार लाळेतून होत असतो.

रोगाची लक्षणे : या रोगाची लागण झाल्यास जनावरे खाणे-पिणे कमी होते. जनावरांना ताप येतो, शरीरात उच्च तापमान तसेच तोंड,सड,खुराच्या मधून स्त्राव येत राहतो.दूध उत्पादनात घट होते. दूध उत्पादनक्षमता कायमची नष्ट होण्याचे प्रमाण वाढते. जनावराच्या जिभेवर, टाळूवर व तोंडाच्या आतील भागात फोड येतात.शरीरात थकवा जाणवतो अशक्तपणा येतो. जनावरांना खुरांतील मोकळ्या भागामध्ये फोड येतात. या रोगाची लागण झालेले जनावर पाय सारखे झटकत असते.

उपाय : रोगी जनावरांनी खाल्लेला चारा इतर जनावरांना देऊ नये. रोगट जनावरांना पाण्याची व्यवस्थाही वेगळ्या ठिकाणी करावी. रोगट जनावरांना जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवावे. रोगग्रस्त जनावरांचा गोठा रोज जंतुनाशकाने धुवावा. माशा, कीटक यांच्यावर नियंत्रण ठेवावे. जनावरांचे लसीकरण केल्यास या रोगाची लागन होत नाही.

## कपाशीवर वाढतोय टोबॅको स्ट्रीक विषाणूंचा प्रादुर्भाव



टीएसव्ही हा विषाणूजन्य रोग असल्यामुळे रोग झाल्यावर उपचार तितके प्रभावी ठरत नाही. अशा स्थितीमध्ये रोगाचा प्रसारच होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे अत्यावश्यक ठरते. या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कपाशीवरील फुलकिडींचे नियंत्रण करणे गरजेचे असते. त्याच प्रमाणे परिसरातील गाजरगवताचे निर्मुलन करावे. यासाठी खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करता येईल.

रोगाचा प्रादुर्भाव असलेली झाडे काढून नष्ट करावीत. शेतातील आणि आजूबाजूच्या बांधावरील पर्यायी यजमान वनस्पती (गाजर गवत, चाकवत) यांचा नायनाट करावा. वेळेवर खुरपणी व कोळपणी करावी. यामुळे तणांचा बंदोबस्ताबरोबरच जमिनीत असलेली फुलकिड्याच्या पिलांची शेवटची अवस्था नष्ट होण्यास मदत होते. ही अवस्था जमिनीत कोषावस्थेप्रमाणे निश्चल राहते. शिफारशीपेक्षा अधिक नत्रयुक्त खते आणि संप्रेरकाचा वापर टाळावा. सातत्याने पिकाचे निरीक्षण आणि सर्व्हेक्षण करून फुलकीड आणि रोगाच्या प्रादुर्भावाचा नियमित आढावा घेत राहावे. रसशोषक किडीच्या नियंत्रणासाठी एकरी २० पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत.

फुलकिडीच्या नियंत्रणासाठी रासायनिक कीडनाशके : (प्रमाण प्रति १० लिटर पाणी) फ्लोनिकॅमिड (५० डब्ल्युजी) ३ ग्रॅम किंवा डायनोटेफ्यूरॉन (२० एसजी) ३ ग्रॅम किंवा बुप्रोफेझीन (२५ एससी) २० मिलि किंवा स्पायनेटोरम (११.७ एससी) ८ मिलि किंवा डायफेनथ्युरॉन (५० डब्ल्यूपी) १२ ग्रॅम.

# कृषी यांत्रिकीकरण योजनेची लाभार्थी यादी जाहीर

### तुमचं नाव असं शोधा

पुणे : शेतकऱ्यांना कमी पैशात शेतीसाठी गरजेची यंत्रे मिळावी यासाठी सरकार कडून कृषी यांत्रिकीकरण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित अवजारे, पीक काढणी यंत्रे, मळणी यंत्रे यांसारख्या गोष्टींवर शेतकऱ्यांना ५०% ते ८०% पर्यंत अनुदानाचा लाभ मिळतो. यामध्ये लहान शेतकऱ्यांना आणि महिला शेतकऱ्यांना खास करून प्राधान्य दिले जाते. या योजनेसाठी सरकारने महाडीबीटी हे पोर्टल सुरु केलं असून अत्यंत पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांची निवड केली जाते. नुकतीच या पोर्टलवर कृषी यांत्रिकरण योजनेसाठी दुसरी सोडत यादी जाहीर झाली आहे. या सोडत यादीत सुमारे ४० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यानंतर लाभार्थ्यांची संख्या वेगवेगळी आहे.




अकोला १५३६ शेतकरी, अमरावती १३३१ शेतकरी, अहिल्यानगर २६८३ शेतकरी, कोल्हापूर ७८३ शेतकरी, गडचिरोली १५० शेतकरी, गोंदिया ४६१ शेतकरी, चंद्रपूर ७७८ शेतकरी, छत्रपती संभाजीनगर १३९४ शेतकरी, जळगाव २०२९ शेतकरी, जालना १७७४ शेतकरी, ठाणे ७ शेतकरी, धाराशिव १७३८ शेतकरी, धुळे १२४४ शेतकरी, नंदुरबार ३४१ शेतकरी, नांदेड २५५९ शेतकरी, नागपूर ७५० शेतकरी, नाशिक १४१८ शेतकरी, परभणी ३०३० शेतकरी, पालघर २० शेतकरी, पुणे १५३८ शेतकरी, बीड २३११ शेतकरी, बुलढाणा ३०७७ शेतकरी, भंडारा ३५७ शेतकरी, यवतमाळ १७३४ शेतकरी, रत्नागिरी २२ शेतकरी, रायगड १६ शेतकरी, लातूर २९८९ शेतकरी, वर्धा १०४६ शेतकरी, वाशिम ११७० शेतकरी, सांगली १०५९ शेतकरी, सिंधुदुर्ग २९२ शेतकरी, सोलापूर २१३१ शेतकरी, हिंगोली १३१३ शेतकरी. या एवढ्या शेतकऱ्यांचा यात समावेश आहे.

तुमचं नाव कसे शोधाल ? सर्वात आधी महाडीबीटी पोर्टलवर जावा. पोर्टल ओपन होताच शेतकरी योजना पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतर खाली निधी वितरित लाभार्थी यादी या पर्यायावर क्लिक करा. आता तुमचा जिल्हा, तालुका, आणि गावाचे नाव टाका यानंतर तुम्हाला तुमच्या गावातील लाभार्थी शेतकऱ्यांची यादी दिसेल. त्यात तुमचं नाव आहे का ते शोधा.

योजनेचा मुख्य उद्देश : शेतकऱ्यांना शेतीची अवजारे खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत करणे. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उत्पादन खर्च कमी करणे. शेतकऱ्याचा वेळ आणि मेहनतीची बचत करणे. शेतकऱ्यांमध्ये यांत्रिकीकरणाविषयी जागरूकता निर्माण करणे. गरीब शेतकऱ्यांपर्यंत कृषी यांत्रिकीकरणाची पोहोच वाढवणे.




### महत्वाच्या घटना

७०८ : ७०८ई.पुर्व : जपानमध्ये पहिल्यांदा तांब्याची नाणी बनवली गेली. (पारंपारिक जपानी तारीख: १० ऑगस्ट ७०८)
१४९८ : वास्को द गामाने कालिकतहुन पोर्तुगालला परतण्याचा निर्णय घेतला.
१८२५ : पोर्तुगालने ब्राझिलच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८३१ : मायकेल फॅरेडे याने विद्युत चुंबकीय प्रवर्तनाचा शोध लावला.
१८३३ : युनायटेड किंगडमने आपल्या साम्राज्यात गुलामगिरीवर बंदी घातली.
१८९८ : गुडईयर कंपनीची स्थापना झाली.
१९१८ : लोकमान्य टिळक यांनी मुंबई येथे काँग्रेसचे विशेष अधिवेशन बोलावले.
१९४७ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीचे अध्यक्ष झाले.
१९६६ : द बीटल्स यांनी शेवटचा स्टेज शो केला.
१८९८ : 'गुडईयर' कंपनीची स्थापना झाली.
१९७४ : चौधरी चरणसिंग यांनी 'भारतीय लोक दल' या राजकीय पक्षाची स्थापना केली.
२००४ : मायकेल शुमाकर यांनी पाचव्यांदा फॉर्मुला वन ड्राईव्हर्स चॅम्पियनशिप जिंकले.
२०१३ : राष्ट्रीय क्रीडा दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८० : नव-अभिजात फ्रेंच चित्रकार ज्याँओगूस्ट डोमिनिक अँग्र यांचा जन्म.
१८३० : आर्जेन्टिनाचे राष्ट्रपिता हुआनबॉतिस्ता अल्बेर्डी यांचा जन्म.
१८६२ : ऑस्ट्रेलियाचे वे५ पंतप्रधान अँड्रु फिशर यांचा जन्म.
१८८७ : भारतीय डॉक्टर आणि राजकारणी जीवराज नारायण मेहता यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९७८)
१८८० : लोकनायक माधव श्रीहरी तथा 'बापूजी' अणे. (मृत्यू: २६ जानेवारी १९६८). पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय शिक्षणतज्ञ, स्वातंत्र्यसेनानी, आधुनिक संस्कृत कवी आणि राजकारणी
१८८७ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रख्यात चिकित्सक व देशसेवक तसचं, गुजरात राज्याचे पहिले मुख्यमंत्री सेवक जीवराज मेहता यांचा जन्मदिन.
१९०१ : पद्मश्री विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील सहकारमहर्षी (मृत्यू: २७ एप्रिल १९८०)
१९०५ : मेजर ध्यानचंद हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध असलेले भारतीय सुवर्णपदक विजेता हॉकीपटू (मृत्यू: ३ डिसेंबर १९७९)
१९१५ : इन्ग्रिड बर्गमन स्वीडीश अभिनेत्री (मृत्यू: २९ ऑगस्ट १९८२)
१९२३ : रिचर्ड अ‍ॅटनबरो इंग्लिश निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते
१९४९ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय अवकाश वैज्ञानिक व भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रो चे प्रमुख व माजी अध्यक्ष, तसचं अवकाश आयोगाचे माजी अध्यक्ष, के. राधाकृष्णन यांचा जन्मदिन.
१९५८ : मायकेल जॅक्सन जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतलेखक, संगीतकार, निर्माता, आणि अभिनेता (मृत्यू: २५ जून २००९)
१९५९ : दक्षिण भारतीय चित्रपट अभिनेता अक्किनेनी नागार्जुन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३३ : पेरूचा शेवटचा इंका राजा अताहु आल्पा यांचे निधन.
१७८० : पंथीयन चे सहरचनाकार जॅकजर्मन सोफ्लॉट यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १७१३)
१८९१ : सायकल चे शोधक पियरे लेलेमेंट यांचे निधन. (जन्म: २५ ऑक्टोबर १८४३)
१९०४ : ओट्टोमन सम्राट मुराद (पाचवा) यांचे निधन.
१९०६ : बाबा पद्मनजी मुळे ख्रिस्ती धर्मप्रसारक, ग्रंथकार व मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक (जन्म: ? मे १८३१)
१९६९ : मेहबूब हुसेन पटेल ऊर्फ 'शाहीर अमर शेख' लोकशाहीर (जन्म: २० आक्टोबर १९१६)
१९७५ : इमॉन डी व्हॅलेरा आयर्लंड प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १४ आक्टोबर १८८२)
१९७६ : काझी नझरुल इस्लाम स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक व हिंदु मुस्लिम ऐक्याचे समर्थक असलेले बंगाली कवी. पश्चिम बंगालमधील असनसोल-दुर्गापूर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला त्यांचे नाव देण्यात येणार आहे. (जन्म: २५ मे १८९९)
१९८२ : इन्ग्रिड बर्गमन स्वीडीश अभिनेत्री (जन्म: २९ ऑगस्ट १९१५)
१९८६ : गजानन श्रीपत तथा 'अण्णासाहेब' खेर महाराष्ट्रीयन मराठी शिक्षणतज्ञ व पुणे येथील महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक तसचं, पुणे विद्यार्थी गृहाचे संस्थापक सदस्य (जन्म: १५ जून १८९८)
२००७ : बनारसी दास गुप्ता ब्रिटीश राजवटील प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र सेनानी, भारतीय राजकारणी व हरियाणा राज्याचे माजी चौथे मुख्यमंत्री (जन्म: ५ नोव्हेंबर १९१७)
२००८ : जयश्री गडकर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी आणि मराठी चित्रपट अभिनेत्री (जन्म: २१ फेब्रुवारी १९४२)



राज्य लोकतंत्र
# अहिल्यानगर/जालना
शुक्रवार दि.२९ ऑगस्ट २०२५ ५



# जालन्यात चांदी -सोन्याचा १०८ किलो वजनाचा बाप्पा: अनोखा गणराय ठरतोय लक्षवेधी

जालना । प्रतिनिधी

रिध्दी- सिद्धीचा दाता, विघ्नहर्ता गणरायाचे गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर सर्वत्र जल्लोषात आगमन झाले. संपूर्ण महाराष्ट्रात ख्याती प्राप्त जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात श्री अनोखा गणेश मंडळातर्फे १०८ किलो वजनी चांदीची सोन्याचा (सुवर्ण) मुलामा असलेल्या दोन कोटींचा गणपती बाप्पांच्या मनमोहक मूर्तीस जल्लोष आणि थाटात विराजमान करण्यात आले. खामगाव येथून जालना शहरातील बडी सडक स्थित छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ रुपम हॉल येथून सजविलेल्या रथात मुर्तीची मंडळ स्थळापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.संबळ वाद्यांचा गजरात सदस्यांनी ठेका धरत गणपती बाप्पा मोरया,मंगल मुर्ती मोरया असा जल्लोषात गजर केला. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.



उद्योजक रामनिवास मानधना परिवारातील सदस्यांच्या हस्ते विधीवत पूजन करून आरती करण्यात आली.या वेळी मंडळाचे अध्यक्ष रितेश मिश्रा,अतुल मंत्री, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम), योगेश मानधना, गोपाल मानधना,हरेश देवावाले,डॉ.अरविंद सोनी, जगदीश मुंदडा,पुरूषोत्तम भक्कड,राजकुमार दायमा, महेश सारस्वत,राजेश अग्रवाल, आनंद मंत्री,गौरीशंकर देवीदान, आदेश मंत्री, किशोर अग्रवाल, रोहित भुरेवाल, गणेश तिवारी, अजय अग्रवाल,धर्मेंद्र भानुशाली, आलोक गोरंट्याल, गणेश भुरेवाल, प्रमोद वाघमारे, महावीर मरलेचा,मनोज झंवर, संदीप गोयल, नितीन अग्रवाल,यांच्या सह मंडळाचे सदस्य, श्री भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान दरवर्षी प्रमाणे यंदा ही भाविकांना वेगवेगळे देखावे, प्रसाद, कुटुंबियांसह आनंद घेता येईल असा मंडळाच्या नावाप्रमाणेच अनोखा गणेशोत्सव साजरा होणार असल्याचे संस्थापक अजय भरतिया, अध्यक्ष रितेश मिश्रा,अतुल मंत्री यांनी सांगितले.

# मराठा समाजातील वंचित घटकाला न्याय मिळावा - बाळासाहेब थोरात

संगमनेर। प्रतिनिधी

मराठा समाजाच्या दीर्घकाळापासूनच्या आरक्षणाच्या मागणीला न्याय मिळालाच पाहिजे. हे केवळ आंदोलन नसून लाखो लोकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. मराठा समाजातील गरीब घटकांना आरक्षणाचा खरा लाभ मिळून त्यांच्या जीवनात समृद्धी यावी, हेच आमचे प्रयत्न आहेत.

हे आंदोलन यशस्वी व्हावे आणि मराठा समाजातील वंचित घटकाला न्याय मिळावा, असे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. ते येथील सुदर्शन निवासस्थानी पत्रकारांशी बोलत होते. यावेळी कांचन थोरात व डॉ. जयश्री थोरात उपस्थित होत्या. थोरात म्हणाले की, जेव्हा न्यायालयीन प्रक्रिया सुरू असते तेव्हा बोलण्याला मर्यादा असतात. पण समाज मोठ्या प्रमाणात संघटित होऊन आंदोलन करत असेल, तर सरकारने त्याचा गांभीर्याने विचार करायला हवा. मराठा समाजाच्या मागण्या योग्य आहेत. त्यामुळे राज्य सरकारने



आणि केंद्र सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा. मराठा समाजातील गरीब घटकाला आरक्षणाचा लाभ मिळालाच पाहिजे. यासाठी वेगळा शोध घेण्याची काही गरज नाही. केंद्र सरकारच्या हाती अनेक अधिकार आहेत. केंद्राने पुढाकार घेतला, तर हा विषय आणखी सोपा होईल. ओबीसी, मागासवर्गीय आणि आदिवासी घटकांच्या आरक्षणाला कुठेही धक्का लागू नये, ही आमची ठाम भूमिका आहे.

# आज किसनगिरी बाबांचा जन्मदिन सोहळा

नेवासा । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांची जन्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र गोधेगाव येथील जन्मभूमी मंदिरात येत्या शुक्रवारी (दि. २९ ऑगस्ट) रोजी जन्मदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

श्री क्षेत्र देवगड येथील श्री गुरुदेव दत्त पीठाचे प्रमुख महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आणि उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा जन्मदिन सोहळा साजरा होणार आहे. प्रवरा नदीच्या तीरावर वसलेल्या गोधेगाव या पवित्र क्षेत्रात दत्तावतारी



किसनगिरी बाबांचा जन्म झाला. प्रवरा माईच्या काठावर तपश्चर्या करून त्यांनी भगवान दत्तात्रेयांना प्रगट केले, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे श्री क्षेत्र देवगडचे मंदिर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि आध्यात्मिक अधिष्ठान बनले आहे. या जन्मदिन सोहळ्याच्या निमित्ताने भास्करगिरीजी महाराज स्वत: उपस्थित राहणार असून, त्यांच्या हस्ते किसनगिरी बाबांच्या जन्मस्थानाचे पूजन होईल. याप्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे कीर्तन होणार असून, आमटी-भाकरी प्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे. किसनगिरी बाबा भक्त मंडळाने पंचक्रोशीतील सर्व भाविकांना या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# घरकुलाचा हप्ता टाकण्यासाठी विशाल कनोजे लाच घेताना पकडला

जालना । प्रतिनिधी

प्रधानमंत्री घरकुल योजनेचा दुसरा हप्ता टाकण्यासाठी घनसावंगी येथील कंत्राटी ग्रामीन गृह निर्माण अभियंता, विशाल कनोजे याला ३० हजाराची लाच घेतानी रंगेहात पकडले. तक्रारदार यांची पत्नी सरपंच असून, तक्रारदार यांच्या आई व गावातील इतर ३९ लाभार्थी यांचे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाचा पहिला हप्ता आरोपी विशाल लक्ष्मणराव कनोजे, वय ३८ वर्ष, पद कंत्राटी ग्रामीन गृह निर्माण अभियंता, सर्कल, राणी उचेगाव ता. घनसावंगी जिल्हा जालना यांनी त्यांचे खात्यावर टाकला होता. दिनांक २४/०८/२५ रोजी तक्रारदार यांनी आरोपी यांचे घरी जाऊन आईचा घरकुलाचा दुसरा हप्ता खात्यावर जमा करणे बाबत विनंती केली असता कनोजा यांनी तक्रारदार यांना म्हटले की तुमच्या सांगण्यावरून चाळीस लाभार्थी यांचा पहिला हप्ता त्यांच्या खात्यावर जमा केला आहे.

जर तुम्हाला दुसरा हप्ता पाहिजे असेल तर तुम्ही पहिले हप्यात टाकलेल्या लाभार्थी यांचे कडून प्रत्येकी एक हजार रुपये प्रमाणे ४० लाभार्थी यांचे एकूण ४०,०००/- रुपये द्या, तेव्हा तुमचा घरकुलाचा दूसरा हप्ता तुमच्या खात्यावर पडेल. अशी लाच मागणी केली. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांचे कडे दि. २५.०८.२०२५ रोजी तक्रार केली.सदर तक्रारीवरुन दि. २६.०८.२०२५ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता विशाल लक्ष्मणराव कनोजे, यांनी लाच मागणी करून ती स्विकारण्याची



समंती दिल्याचे निष्पन्न झाले. आज दि. २७.०८.२०२५ रोजी ११.४५ वा. च्या सुमारास आरोपी इलोसे विशाल कनोजे यांचे गंगाधरवाडी येथील राहते घरी जालना येथे सापळा कारवाई दरम्यान ताक्रारदार यांचेकडे ३०,०००/-रुपये उपलब्ध असल्याने तक्रादार यांचेकडून पंचासमक्ष विशाल कनोजे, यांनी ३०,०००/- लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पोलीस निरीक्षक, कोमल शिंदे यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले व अंगझडती घेतली असता लाच रक्कम ३०,०००/- रुपये व रेडमी कंपनीचा मोबाईल मिळून आला. पुढील कारवाई करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

# नेवासा नगरपंचायतीच्या प्रभाग रचनेवर ३३ हरकती



नेवासा । प्रतिनिधी

नेवासा नगरपंचायतीच्या १८ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर आलेल्या ३३ हरकतींवर गुरुवारी (दि. २८) सकाळी ११:३० वाजता नेवासा तहसील कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. प्रांताधिकारी सुधीर पाटील आणि नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी ३३ पैकी ३० तक्रारदार उपस्थित होते.। प्रतिनिधी

सुनावणी दरम्यान प्रांताधिकारी पाटील यांनी प्रत्येक तक्रारदाराचे म्हणणे स्वतंत्रपणे ऐकून त्यांच्या हरकती व आक्षेप नोंदवले. ही सुनावणी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नेवासा नगरपंचायतीने २०११ च्या जनगणनेनुसार तयार केलेली १७ प्रभागांची प्रारूप रचना १८ ऑगस्ट रोजी बदलून प्रसिद्ध केली होती. यावर हरकती नोंदवण्यासाठी २१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती, असे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी जाहीर केले होते. सुनावणीवेळी तक्रारदारांनी प्रभाग रचनेवर अनेक आक्षेप नोंदवले. प्रभाग रचना मुख्य रस्त्याच्या डाव्या-उजव्या बाजूने असावी, अशी प्रमुख मागणी होती. तसेच, प्रभाग रचना करताना बारीकसारीक गोष्टींचा विचार झाला नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला. प्रभाग रचनेसाठी प्रगणकांकडून कोणताही सर्व्हे झाला नसल्याचा आक्षेपही अनेकांनी नोंदवला. यावेळी तक्रारदारांनी प्रभाग रचनेला तीव्र विरोध दर्शवला. सुनावणीला डॉ. करणसिंह घुले, संजय सुखधान, गुफुरभाई बागवान, सतीश गायके, सचिन नागपुरे, भाऊसाहेब वाघ, राजू पोतदार, ॲड. अशोक करडक, अमित मापारी, राजू मापारी, राजू मुथ्था, सुनील वाघ, रुपेश उपाध्ये, बंडू शिंदे, नितीन मिरपगार, कृष्णा डहाळे, भारत डोकडे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. निवडणुकीच्या नावाखाली प्रभाग रचनेचा प्रशासकीयदृष्ट्या अनुकूल डाव साधण्याचा प्रयत्न झाला असून, हरकतींची सुनावणी ही केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी आहे, असा गंभीर आरोप उपस्थित तक्रारदारांनी व्यक्त केला.

# अहिल्यानगर जिल्ह्यात १८ लाख आयुष्मान कार्डधारक
## जिल्हा प्रशासनाच्या वतीने कार्ड नोंदणीसाठी विशेष मोहीम

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यात १० लाख ५५ हजार कुटुंबांपैकी ४१ लाख ६५ हजार लाभार्थी आयुष्मान कार्डसाठी पात्र ठरले आहेत. आतापर्यंत १८ लाख २३ हजार आयुष्मान कार्ड तयार करण्यात आले आहेत. उर्वरित पात्र लाभार्थ्यांनी आपले आयुष्मान कार्ड काढावेत, यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमेत नागरिकांनी कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

जिल्ह्यात आयष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात आली आहे. या योजनांमुळे लाभार्थ्यांना प्रति कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार असून, १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व विशेष उपचारांचा समावेश आहे, तसेच कुटुंबातील ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'आयुष्मान भारत वय वंदना कार्ड'च्या माध्यमातून अतिरिक्त ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबातील




सदस्याकडे आयुष्मान भारत गोल्डन कार्ड असणे आवश्यक आहे. हे कार्ड स्वतः लाभार्थी, आशा स्वयंसेविका, आपले सरकार सेवा केंद्र, तसेच स्वस्त धान्य दुकानदार (राशन दुकानदार) यांच्यामार्फत सहज उपलब्ध आहे, तसेच गूगल प्ले स्टोअरवरून 'आयुष्मान ॲप' डाउनलोड करूनही सुविधा मिळते. लाभार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत ३१ ऑगस्ट २०२५ यापर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, गट विकास अधिकारी, ग्रामसेवक, आशा स्वयंसेविका, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व सरपंच यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# रुग्णसेवेत ईश्वर शोधणारा सच्चा रुग्णसेवक नरसिंग मामा चन्नया-डॉ. संजय तांदळे

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील रक्त पेढी विभागात परिचर तथा मुकादम पदावर कार्यरत असलेले नरसिंग चन्नय्या( मामा ) यांचा जिल्हा रुग्णालयातील चाळीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच दि. ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. रुग्णालयात मामा म्हणूनच ते सर्वांचे परिचित होते. रुग्णालयात येणाऱ्या बेघर, वंचित ,गोरगरीब ग्रामीण भागातील रुग्णासह सर्वांचीच अस्ताविक पणे चर्चा करून गरजवंताला ते स्वतः रुग्णांची चिठ्ठी काढून ॲडमिट करेपर्यंत मदत करून रुग्णांची काळजी घेत होते.

वेळप्रसंगी चालता न येणाऱ्या वयोवृद्ध रुग्णास स्वतः उचलून घेऊन संबंधित रुग्णास दुसऱ्या मजल्यावर ॲडमिट केलेले आहे. तसेच अपघाती रुग्णांसह इतर रुग्णांना देखील रक्ताची गरज भासल्यास ते संबंधितांना तातडीने रक्त उपलब्ध करून देऊन अनेकांचे प्राण देखील



त्यांनी वाचवले आहेत. बेघर जिव्हाळा निवारा केंद्रातील वयोवृद्ध निराधारांना शासकीय रुग्णालयात ॲडमिट केल्यानंतर ते स्वतः रुग्णांची काळजी घेत होते. बेघर जीव्हाळा केंद्रातील वयोवृद्ध रुग्णांचा रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाल्यास रुग्णाचे पोस्ट मार्टम होईपर्यंत मदत करत होते. असे अनेक अनुभव बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाचे अशासकीय सदस्य डॉ. संजय तांदळे यांनी रुग्णसेवक नरसिंग मामा चेन्नया यांच्या सेवापुर्ती निमित्त दि. २६ ऑगस्ट २०१८ रोजी बेघर निवारा केंद्रामध्ये व्यक्त केले. जिल्हा पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर ,शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ, जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त कर्मचारी श्याम मार्कंडे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले . बेघर जीव्हाळा केंद्राच्या वतीने नरसिंग चेन्नया मामाचा सपत्नीक शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की,जिव्हाळा केंद्रातील निराधारांच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर राहील त्यांच्या पत्नी स्वामी समर्थ च्या सेवेकरी सौ .वरलक्ष्मी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक जीव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, सूत्रसंचालन व्यवस्थापक राजू वंजारे, तर आभार काळजीवाहक छायाताई सरोदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी जिव्हाळा केंद्रातील निराधारांना नरसिंग मामा यांनी सपत्नीक स्नेहभोजन वाटप करून त्यांच्या समवेत स्नेह भोजनाचा त्यांनी आस्वाद घेतला.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४९९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २१/०८/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) रामेश्वर काकासाहेब कटारे प्लॉट नं. १ नं.प.मि.नं.१८-५४-१ गाळा नं.७ नं.प.मि.नं.१८-५४-१/७ गाळा नं. ७ नं.प.मि.नं.१८-५४-१/१४ गाळा नं. ८ नं.प.मि.नं.१८-५४-१/५ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- गाळा क्र. ६
पश्चिम : कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- वारण्यासाठी ८.८ X ८ फुटाची खुली जागा
उत्तरः कोर्ट रोड


स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे थाटात आगमन

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे आज मोठ्या थाटात वाजतगाजत आगमन झाले. ना. पंकजाताई मुंडे व कुटूंबियांनी श्रींची उत्साहात प्रतिष्ठापना केली. ना. पंकजाताई मुंडे यांच्या निवासस्थानी दरवर्षी गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीची प्रतिष्ठापना केली जाते. स्वतः पंकजाताई मुंडे या उत्सवाची सर्व तयारी करतात. गणपतीची मुर्ती आणण्यापासून ते त्याची स्थापना करण्यापर्यंत त्या स्वतः बारकाईने लक्ष घालतात, यावर्षी त्यांनी गणपतीची आरास अतिशय आकर्षक व सर्वांचे लक्ष वेधून घेणारी केली आहे. सकाळी ढोल ताशांच्या निनादात गणरायाचे आगमन झाले, त्यानंतर विधीवत पूजनाने ना. पंकजाताई मुंडे, त्यांचे चिरंजीव आर्यमान पालवे यांनी श्रींची प्रतिष्ठापना केली. यावेळी माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, अगस्त्य खाडे व कुटूंबिय उपस्थित होते.

बाप्पाने प्रत्येक संघर्षावर मात करून पुढे जाण्यासाठी शक्ती दिलीय. यापुढील काळात देखील सामान्य माणसासाठी, वंचितासाठी सातत्याने काम करता यावं एवढी शक्ती मला मिळावी अशी प्रार्थना आपण बाप्पाकडे केली असल्याचं ना. पंकजाताई मुंडेंनी माध्यमाशी बोलताना सांगितलं. दरम्यान, पर्यावरणपूरक गणेश मूर्त्या स्थापन करण्याबाबत त्या म्हणाल्या, मी आता पर्यावरण मंत्री असले तरी फार पूर्वीपासून माझ्या घरी मातीचाच गणपती मी आणते. तथापि पीओपी च्या मूर्त्या शक्यतो आणूच नका, आणल्याच तर त्याचे विसर्जन पर्यावरण विभाग आणि न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करावं ही लोकांकडून अपेक्षा व्यक्त आहे असं त्या म्हणाल्या.



# हनुमान वस्ती जवळ २१ लाखाचा गांजा पकडला

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील राजुरी- खालापूरी रस्त्यावर एका कारमध्ये गुन्हे अन्वेषण शाखेच्या टीमला २१ लाख १५ हजार रुपयांचा १०५ किलो ७५० ग्राम गांजा मिळून आला. या कारचा अपघात झाल्याने या टीमने चौकशी केली असता या गाडीत गांजा असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी बाबासाहेब दहातोंडे, दत्तू सकट या दोघांना ताब्यात घेतले. असून हा गांजा रायमोहाकडे नेत असल्याचे या दोघांनी सांगितले.**



गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशावरून पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर आणि त्यांचे टीम पाटोदा येथील घरफोडीच्या प्रकरणात तपास करत असताना सकाळी सातच्या सुमारास एक मारुती सुझुकी सियाज गाडी वेगाने राजुरी वरून खालापूरी रोडने जाताना दिसली ही गाडी हनुमान वस्ती जवळ गेल्यानंतर या कारचा अपघात झाला. खटावकर आणि त्यांच्या टीमने त्याचा पाठलाग करून या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये पाच गोण्या गांजा ज्याचे एकूण वजन १०५ किलो ७५० ग्रॅम एवढे असून त्याची किंमत २१ लाख १५ हजार रुपये एवढी होते. याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक बंटेवाड, पोलीस निरीक्षक खेडकर यांना दिल्यानंतर त्यांनी ततकाळ घटनास्थळी भेट दिली.या प्रकरणात बाबासाहेब विश्वनाथ दहातोंडे रा. चांदा ता. नेवासा व दत्तू मुरलीधर सकट रा. टाकळी खंडेश्वरी ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या दोघांना ताब्यात घेतले. यांच्याकडे विचारपूस केली असता हा गांजा राजुरी कडून रायमोहाकडे जात होता. मात्र पोलिसांच्या भीतीने या दोघांनी मार्ग बदलला. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ८(क),२०(ब),(क) व कलम २८१, १२५ (अ)बी.एन.एस.अन्वये गुन्हा दाखल झाला असून आरोपी दत्तू सकट याला एक नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड,पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, अनंत मस्के, राहुल शिंदे, मनोज जोगदंड, सतीश मुंडे, बाळू सानप, अशपाक सय्यद, अर्जुन यादव, अंकुश वरपे, मनोज परजणे, नितीन वडमारे ,सिद्धार्थ मांजरे आदींनी केली.

# सोलार ऊर्जेचा वापर पर्यावरणाशी सुसंगत -खुर्पे



माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील बेस्ट प्रॅक्टिस विभागाच्या अंतर्गत सौर ऊर्जेचा वापर करण्याच्या संदर्भामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ''सौर ऊर्जा पॅनल आणि ऊर्जा बचत उपक्रम'' हा उपक्रम घेऊन महाविद्यालय शैक्षणिक गुणवत्ते सोबतच सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना आणि सर्व नागरिकांना सौरऊर्जेचे महत्त्व पटवून देण्यासाठी विचार आणि प्रसार करणार आहे त्या दृष्टिकोनातून या विभागाचे उद्घाटन आणि विभागाची गुगल फॉर्म ची लिंक चे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ होते. त्यांना आपल्या मार्गदर्शनातून असे आवाहन केले,की सौर ऊर्जा प्रकल्प हा किती महत्वाचा आहे.सर्वांगीण फायदा असणार एकमेव ऊर्जा स्त्रोत म्हणजेच सौर ऊर्जा स्त्रोत आहे.तो शेतकऱ्यांसाठी आर्थिक बचतीचे खूप मोठे माध्यम आहे केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारच्या या योजनेचा आपल्या शेतीमध्ये आणि घरामध्ये आपण त्याचा निश्चित फायदा घ्यावा असेही आव्हान त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले. पारंपारिक ऊर्जा स्त्रोत जे आपल्याकडे पान ३ वर

# तलवाडा गाव तलाव फुटण्याचा मार्गावर

## तलवाडा ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामसेवक आणि महसुल विभाग निद्रिस्त

तलवाडा । प्रतिनिधी

याबाबत तहसीलदार खोमणे यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शेख खिजर यांनी दुरध्वनी वरुन याविषयी माहिती दिली.



तलवाड़ा गाव हे विस ते बावीस हजार लोक संख्येचे असून या गावातील तलाव संरक्षण भिंती लगट बोटावर मोजण्या इतक्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केलेले आहे या लोकांना पंधरा दिवसांची पहीली नोटीस देण्यात आली होती आता मुदत संपली असताना दुसरी नोटीस का देण्यात येत नाही.हे अतिक्रमण लवकरात लवकर न काढल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी हे जलसमाधी आंदोलन कोणत्याही क्षणी आणि कुठेही करु असा इशारा प्रशासनास याद्वारे देण्यात येत आहे आणि याला जबाबदार तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब आणि प्रशासन राहील,अतिक्रमण तलाव संरक्षण भींती लगटच्या आतिक्रमण संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने गाव तलाव फुटण्याचा धोखा लक्षात घेऊन संरक्षण भिंती लगटच्या आतिक्रमण उठवण्या संदर्भात मागणी केलेली होती. त्यास आणुसरुन प्रशासनाने संबधित आतिक्रमण धारकांना दिलेल्या नोटीसाचा कालावधी आज रोजी संपत आसतांना गाव तलाव हे पाठीमागच्या बाजुने फुटण्याचा मार्गावर असताना तलवाडा ग्रामपंचायत ग्रामसेवक,प्रशासक व महसुल विभाग निंद्रास्त झोपेत दिसुन येत असल्याने गावक- यातुन पान ३ वर



**शिरूर का. : जिल्हा परिषद सदस्य रामदास बडे यांची भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करताना माऊली शिरसाट मोहन आघाव केशव तांदळे सुनील मिसाळ आदी.**



माजलगाव:- गोरखनाथ परसुराम सोळंके यांची कन्या कु. सिद्धी गोरखनाथ सोळंके ही एम बी बी एस प्रवेशासाठी पात्र ठरल्याने तिचा पालकासह सत्कार करुन शुभेच्छा देताना शेकापचे भाई ॲड.नारायण गोले पाटील,विनायकराव कदम, परमेश्वर डाके, राजेभाऊ आव्हाड, सतिश बुरंगे आदि.

# सातव्या वेतन आयोगाचा ५ वा हप्ता देण्यात यावा; नगर परिषद कर्मचाऱ्यांचे उपोषण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगर परिषदेतील सर्व कर्मचारी सातव्या वेतन आयोगाचा पाचवा हप्ता तात्काळ मंजूर करण्यात यावा, या मागणीसाठी दिनांक २८ ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालय माजलगाव येथे उपोषणास बसले आहेत.



यापूर्वी दिनांक २१ ऑगस्ट रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र वारंवार मागणी करूनही दखल न घेतल्यामुळे सर्व कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या उपोषणात विशाल शिंदे, कैलाश भिसे, गोविंद साबळे, श्रावण ढगे, बन्सी वाघमारे, राम मिसाळ, एकनाथ टाकणखार, दिनकर कांबळे, चत्रभुज मिसाळ, आनंत वाघमारे, सय्यद आरेफ, सिकंदर खान, नसरूल्ला खाँ, रईसोद्दीन इब्राहीम, रावईबाई भोले, मालनबाई साळवे, केशरबाई साळवे, गंगुबाई डोंगरे, साळुबाई कांबळे, लक्ष्मीबाई वाल्मिकी, शोभाबाई पान ३ वर

# सत्यशोधक मातंग समाज मेळाव्यास उपस्थित रहा - विशाल गवळी

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील जुना बस स्थानक परिसरात आयोजित करण्यात आलेल्या सत्यशोधक मातंग समाज मेळावा व लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विशाल गवळी यांनी केले आहे. युवा नेते बाबा कांबळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या भव्य दिव्य मेळाव्यास समाजभूषण आमदार अमित गोरखे उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत.



याबाबत प्रसिद्धीसाठी देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे सत्यशोधक लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा सार्वजनिक जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन पान ३ वर

# धनगर जवळका येथील गावकऱ्यांनी केली वायकर कुटुंबियांच्या मुलांना आर्थिक मदत

**पाटोदा । प्रतिनिधी**

मागील महिन्यामध्ये पाटोदा येथे घाटेवाडी येथील वायकर पती, पत्नी यांचा सरकारी हॉस्पिटल जवळ बस सोबत अपघात झाला. त्यामध्ये दोन्ही पती, पत्नी जागीच गेले. पाठी मागे दोन लहान मुले आहेत. अतिशय वाईट घटना घडली होती.

गेलेली वेळ तर परत येऊ शकत नाही.पण आता त्या मुलांच्या भविष्याच काय ? त्यापैकी एक मुलगा आदित्य वायकर हा जवळाला येथील ह.भ.प.भीमसिंह महाराज वारकरी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत असून तो अखंड हरिनाम सप्ताह निमित्त धनगर जवळका या ठिकाणी उपस्थित होता ही गोष्ट धनगर जवळका



ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर

आपण ही फुलणं फुलाची पाकळी मदत करू असा विचार सर्व ग्रामस्थांनी केला आणि सप्ताह काळात ग्रामस्थांनी मिळून एकूण २२ हजार आठशे रुपये एवढी रक्कम जमा केली होती तसेच आदरणीय आमचे मार्गदर्शक श्री.पी.एस.पवार सर यांनी त्यांच्या मिळणाऱ्या पेन्शन मधून प्रति महिना पाचशे रुपये देण्याचे कबुल केले होते. त्याप्रमाणे आज रोजी श्री संत भिमसिंह महाराज वारकरी संस्था जवळाला या ठिकाणी जाऊन सदरील रक्कम ही ह भ प माऊली महाराज कोठुळे ह भ प मृदंगाचार्य अप्पासाहेब महाराज कोठुळे यांच्या समवेत धनगर जवळका ग्रामस्थांच्या वतीने माननीय पीएस पवार सर उपसरपंच रमेश जी काळे नितीन दुधाळ व मी स्वतः ( प्रकाश खाडे) उपस्थित राहून आदित्य वायकर यास दिली. तसेच त्या मुलाचे शिक्षणासहित संपूर्ण जबाबदारी व पालकत्व ह.भ.प.माऊली महाराज कोठुळे व ह.भ.प.आप्पासाहेब महाराज कोठुळे यांनी घेतली आहे.

# नवनाथ शिराळे व शंकरराव देशमुख यांच्या हस्ते 'श्री' ची भाजप कार्यालयात स्थापना

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी कार्यालयाच्या ऑफिसमध्ये आज भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशाची स्थापना करण्यात श्री गणेशाची स्थापना करताना मुख्य यजमान म्हणून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाचे शास्त्र युक्त पद्धतीने वैदिक मंत्राच्या साह्याने विधिवत



पूजा करून ही स्थापना करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब तसेच देविदास नागरगोजे साहेब व नागरगोजे साहेब तसेच शांतिनाथ डोरले संकेत सानप कृष्णा खेंडेकर गणेश लांडे केशव बडे साहेब अनिल चांदणे डॉक्टर वनवे साहेब जिल्हा परिषद माजी अध्यक्ष मीराताई गांधले मॅडम राजू शहाणे अमोल वडकिले राजेश चरखा भालचंद्र कुलकर्णी बाबुराव परळकर व पत्रकार संजय देवा कुलकर्णी पिपळगावकर सह योगेश नाकाडे सह इतर सर्व पदाधिकारी व गणेश भाविक भक्त व भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व श्री गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते श्री गणेशाची स्थापना विधिवत पूजा करण्यासाठी श्री वेदशास्त्र संपन्न विपुल रत्नपारखी देवा उपस्थित होते श्री गणेशाची स्थापना मोठ्या उत्साहामध्ये आणि मोठ्या आनंदाच्या भक्तीमय वातावरणामध्ये व पवित्र पान ३ वर

# पोहरादेवी येथे राज्यस्तरीय भटके विमुक्त दिवस साजरा होणार

## रामेश्वर नाईक, भाजपा,आर.एस.एस व बंजारा नेत्यांची असणार उपस्थिती; महायुती सरकारचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

इंग्रजांच्या जोखडातून मुक्ती मिळाल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले,हे खरं असलं तरी या देशातील करोडोंच्या संख्येने असणारे व जगण्यासाठी रोज मरण यातना भोगत असलेल्या भटके विमुक्तांना ३१ ऑगस्ट १९५२ म्हणजे तब्बल पाच वर्षे उशिरा देशातील अन्यायकारक व्यवस्थेच्या जोखडातून स्वातंत्र्य मिळाले आहे. हि ऐतिहासिक आठवण जागवणारा दिन यावर्षी भाजपा-महायुती सरकारने भटके विमुक्त दिवस म्हणून राज्यभर साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

त्या अनुषंगाने देशातील बंजारा समाजाची पवित्र काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वाशिम जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथील





भक्तीधाम या धार्मिक संस्थानात रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत भटके विमुक्त दिवस अत्यंत थाटामाटात साजरा करण्यात येणार आहे.भटके विमुक्त समाजासाठी सदरील दिवस केवळ उत्सव नसून नव्या इतिहासाची नांदी आहे.बंजारा व समस्त भटके विमुक्त समाजाचा सर्वांगीण विकासाचा संकल्प पोहरादेवीच्या पवित्र भूमीतून मांडला जाणार आहे.बंजारा समाजाची देशपातळीवरील सर्वात मोठी संघटना म्हणून नावाजलेल्या असलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने सदरील भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला बंजारा समाजाचे धर्मगुरू तथा आमदार बाबुसिंगजी महाराज,मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक,बंजारा तिर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते,भगवंत सेवक किसनभाऊ राठोड तसेच भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ नेते मंडळी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

भटके विमुक्त हा दिवस राज्य व जिल्हा स्तरावर साजरा करण्यात यावा,सदर दिवशी भटक्या विमुक्त समाजाच्या संस्कृतीचे जीवनमूल्ये,परंपरा दर्शविणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक व माहीतीपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे असे आवाहन महायुती सरकारच्या वतीने करण्यात आले आहे. शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भटके विमुक्त समाजाच्या वर्तमान काळातील पान ३ वर

# समाधान व्यसनमुक्ती केंद्राचा आज लोकार्पण सोहळा

## मानसोपचार तथा व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मानसोपचार तथा व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांच्या समाधान मानसोपचार रूग्णालय व व्यसनमुक्ती केंद्राच्या सोळाव्या वर्धापन दिनानिमित्त सुसज्ज सोयींनी युक्त अत्याधुनिक व्यसनमुक्ती केंद्राचा लोकार्पण सोहळा उद्या शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी हाऊसिंग सोसायटी अंबाजोगाई येथे संपन्न होणार आहे. येणाऱ्या काळात व्यसनाधीनता हा अत्यंत वेगाने वाढणारा मानसिक आजार असल्याचे सुतोवाच डॉ.राजेश इंगोले यांनी केले आहे.



या व्यसनाधीनतेच्या विळख्यात हजारो तरूण तरूणी व समाजातील प्रत्येक घटक सापडत असल्याचे चित्र दिसत आहे. समाजामध्ये अत्यंत वेगाने वाढत असलेली व्यसनाधीनता थांबविण्यासाठी पात्र मानसोपाचाहर तज्ज्ञ असलेले व्यसनमुक्ती केंद्र तुरळक आहेत. त्यामुळे लोकांची ही गरज ओळखून सामाजिक बांधिलकी जोपासत हे व्यसनमुक्ती केंद्र सुरू करीत असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. व्यसनाधीनता ही तज्ज्ञ माणूस उपचार तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली व त्याच्या तज्ञ उपचाराखाली उपचार केल्यास वेगवेगळ्या प्रकारची व्यसने सुटू शकतात आणि तो व्यक्ती या व्यसनांच्या विळख्यातून सही सलामत बाहेर पडू शकतो. त्यामुळे हे व्यसनमुक्ती केंद्र सुरू करीत असल्याचे डॉ राजेश इंगोले यांनी सांगितले. हे व्यसनमुक्ती केंद्र अत्याधुनिक सोयींनी युक्त, तज्ज्ञ समुपदेशक, तज्ज्ञ कर्मचारी वृंद, मानसोपचार तज्ज्ञ यांच्या देखरेखीखाली कार्यरत राहणार असल्याचे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगीतले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार, दि.२९ ऑगस्ट २०२५ । पान ७

# पिंपरी चिंचवडची पर्यावरणपूरक धोरणे पाहून आंध्र प्रदेश शिष्टमंडळ प्रभावित!

## घनकचरा व्यवस्थापनातील नाविन्यपूर्ण प्रकल्पांची घेतली प्रत्यक्ष माहिती

पिंपरी । प्रतिनिधी

आंध्र प्रदेश राज्यातील विविध महापालिका व संस्थांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कचरा व्यवस्थापन प्रकल्पांचा अभ्यास करण्यासाठी विशेष दौऱ्यावर आले होते. त्यांनी शहरातील विविध प्रकल्पांची पाहणी करताना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरणपूरक धोरणांबद्दल समाधान व्यक्त केले.

शिष्टमंडळात तडीपात्री महापालिकेचे आयुक्त एस. शिव रामकृष्णा, विशाखापट्टणम महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ई. एन. व्ही. नरेशकुमार, कार्यकारी अभियंता के. गुरप्पा यादव, कार्यकारी अभियंता एम. नारायण स्वामी, तांत्रिक तज्ज्ञ श्रीनिवास रेड्डी, वरिष्ठ प्रकल्प सहकारी (सीडीएमए) एम. डी. जावेद आणि प्रकल्प सहकारी (स्वच्छ आंध्र कॉर्पोरेशन) एस. डी. रहतुल्लाह यांचा समावेश होता. यासर्वांना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल, ह क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले आणि कनिष्ठ अभियंता स्वालीहा मुल्ला यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली.

आंध्र प्रदेश राज्यातील शिष्टमंडळाने शहरातील आरोग्य विभाग व पर्यावरण विभाग यांच्या अधिपत्याखाली चालू असलेले दारोदारी कचरा संकलन व वर्गीकरण प्रक्रिया, दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्प, कचरा ट्रान्स्फर स्टेशन, मोशी येथील बांधकाम राडारोडा प्रक्रिया प्रकल्प, बायो मिथीलेशन प्रकल्प आदी महत्त्वपूर्ण उपक्रमांचा आढावा घेत प्रत्यक्ष पाहणी दौरा केला.शहरातील निवासी संकुले, औद्योगिक क्षेत्रे, व्यावसायिक आस्थापना, रुग्णालये, भाजीबाजार यांसारख्या विविध स्त्रोतांमधून निर्माण होणारा घरगुती कचरा, प्लास्टिक, पालापाचोळा, उरलेले अन्न, जैविक व अजैविक कचरा, ई-कचरा तसेच जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम महापालिकेकडून केले जाते, या संपूर्ण प्रक्रियेची माहिती शिष्टमंडळाने जाणून घेतली.या शिष्टमंडळाने दापोडी शून्य कचरा प्रकल्पाला भेट देऊन संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली. या प्रकल्पात स्थानिक महिलांच्या सहभागातून दररोज ४०० हून अधिक घरांचा कचरा गोळा केला जातो. ओला कचरा खतामध्ये रूपांतरित केला जातो, तर सुका कचरा विविध मशीनद्वारे पुनर्वापरयोग्य पदार्थांमध्ये बदलला जातो. तसेच सॅनिटरी वेस्ट इनसिनिरेटरद्वारे सुरक्षित विल्हेवाट लावली जाते, याची सविस्तर माहिती शिष्टमंडळाने घेतली.याशिवाय मोशी येथील २०० टीपीडी क्षमतेचा बांधकाम राडारोडा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पाला भेट देत शिष्टमंडळाने येथील कामकाज नेमके कसे चालते, हे जाणून घेतले. तसेच कासारवाडी, गवळीमाथा आणि काळेवाडी येथील प्रत्येकी २०० मेट्रिक टन क्षमतेची केंद्रे



सध्या यशस्वीरित्या सुरू असून, आंध्र प्रदेशच्या शिष्टमंडळाने या केंद्रांची पाहणी केली. मोशी येथील हॉटेल वेस्ट टू बायोगॅस (बायो मिथीलेशन) प्रकल्पाद्वारे शहरातील सर्व हॉटेल्स, खानावळी, मंगल कार्यालयांतून निर्माण होणारा ओला कचरा विशेष जीपीएस यंत्रणेसह सज्ज वाहनांमार्फत गोळा करून त्याचे विलगीकरण व पोच करण्याच्या प्रक्रियेबाबत शिष्टमंडळाला सविस्तर माहिती देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महापालिकेने घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात शाश्वत व नाविन्यपूर्ण उपाययोजना राबविल्या आहेत. शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे. नागरिकांचा सहभाग, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व काटेकोर नियोजन यांच्या जोरावर आज महापालिकेने घनकचरा व्यवस्थापनात एक आदर्श उभा केला आहे.

-शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

मोशी येथे उभारण्यात आलेला कचरा प्रक्रिया प्रकल्प, तसेच शहरात उभारलेली ट्रान्स्फर सेंटर्स ही स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले आहेत. कचरा संकलन, वर्गीकरण आणि त्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन करण्यासाठी वेगवेगळे प्रकल्प उभारण्यास पिंपरी चिंचवड महापालिकेचा प्रयत्न असतो. हे प्रकल्प पाहण्यासाठी विविध राज्यांतून शिष्टमंडळे येतात. यावरून या प्रकल्पाचे यश सिद्ध होते.

-विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिका ज्या पद्धतीने कचऱ्याचे विभाजन आणि सर्व प्रकल्पांची देखभाल करत आहे, तो इतर शहरांसाठी एक आदर्श आहे. तसेच महापालिकेची धोरणे ही खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक असून, ही धोरणे विशाखापट्टणम महापालिकेतही राबविण्याचा आमचा मानस आहे.

– डॉ. ई. एन. व्ही. नरेशकुमार, मुख्य वैद्यकीय अधिकारी ,विशाखापट्टणम महापालिका

# धारिवाल कुटुंबाकडून विठ्ठल मंदिर गणपतीला चांदीचा मुकुट अर्पण

शिरूर : शिरूर शहरातील मानाचा चौथा समजला जाणारा श्री विठ्ठल मंदिर गणपती उत्सव यंदा खास ठरला आहे. शहरातील प्रसिद्ध उद्योगपती प्रकाशशेठ धारिवाल व त्यांचे सुपुत्र आदित्य धारिवाल यांच्या हस्ते गणपतीची प्राणप्रतिष्ठा विधीपूर्वक पार पडली. या प्रसंगी धारिवाल कुटुंबाकडून पाच किलो वजनाचा भव्य चांदीचा मुकुट गणपती बाप्पाला अर्पण करण्यात आला.

दानशूर वृत्ती, समाजाभिमुख कार्य व देवभक्ती यासाठी ओळखले जाणारे धारिवाल कुटुंब गेली तीन पिढ्यांपासून शिरूरकरांच्या हृदयात घर करून आहे. या पिढीजात नात्याची प्रचिती आज शिरूरकरांना पुन्हा अनुभवायला मिळाली. कुंभार आळी येथून गणपतीची सुरेख मूर्ती पारंपरिक शास्त्रीय वाद्यांच्या गजरात नगरातील प्रमुख रस्त्यांवरुन मिरवणुकीत आणण्यात आली. आदित्य धारिवाल यांनी मुकुटाचे वहन करून मिरवणुकीत अग्रभागी स्थान मिळवले, तर प्रकाशशेठ धारिवाल व शिरूरचे माजी आमदार अशोक पवार यांच्यासह मान्यवर



पायी चालत सहभागी झाले.

या भव्य मिरवणुकीस शिरूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कुंभार आळीत मिरवणुकीचे स्वागत मोठ्या आतषबाजीने करण्यात आले. भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या या क्षणी वातावरणात गणपती बाप्पा मोरया चा जयघोष दुमदुमला. या प्रसंगी प्रकाशशेठ धारिवाल म्हणाले,गणपती उत्सव हा शिरूरकरांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. आमच्या कुटुंबाचीही गणरायावर अपार श्रद्धा असून ही परंपरा आम्हाला जपायची आहे.तर आदित्य धारिवाल यांनी प्राणप्रतिष्ठेच्या आनंदाविषयी बोलताना व्यक्त केले, गणपती बाप्पाची प्राणप्रतिष्ठा करण्याचा मान लाभल्याने आम्हाला मनस्वी आनंद व प्रसन्नता लाभली आहे.

या प्रसंगी नगरसेवक मुज्जफर कुरेशी, हाफिज बागवान, एजाज बागवान, किरण पठारे, बाळासाहेब जामदार, विजय शिर्के, संतोष शिंदे, दत्तात्रय काळे, संतोष जामदार, संभाजी जामदार, पोपट जामदार, बाबुराव जामदार, राजकुमार जामदार, वसीम शहा, नितीन जामदार, अमित शिर्के, विशाल भावटणकर, श्रीतोष अभंग, मयूर जामदार, शरद जामदार, सनी थोरात, चेतन जामदार, विक्रम जामदार, नितीन शिर्के, रोहन जामदार, नरेंद्र कडूस्कर, पप्पू शिर्के, कुणाल क्षीरसागर, प्रशांत आतकर, चरण जामदार, निलेश कुंभार यांच्यासह कुंभार आळीतील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत अक्षय शिर्के यांनी केले. प्रास्ताविक योगेश जामदार यांनी तर आभार प्रदर्शन शंकर जामदार यांनी केले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका डिजिटल प्रवास ३० पुस्तकाचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते प्रकाशन

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांनी संकलित केलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका डिजिटल प्रवास ३० या पुस्तकाचे प्रकाशन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी महापालिकेत ३० वर्षांची प्रदीर्घ सेवा पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या पोमण यांचा आयुक्त सिंह यांच्या हस्ते सन्मानही करण्यात आला.



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सहआयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह सहशहर अभियंता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, क्षेत्रीय अधिकारी, मुख्य सुरक्षा अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आदी उपस्थित होते.या प्रसंगी आयुक्त शेखर सिंह म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या गेल्या तीन दशकांच्या डिजिटल प्रवासाचे मोलाचे दस्तऐवजीकरण ‘डिजिटल प्रवास ३०’ या ग्रंथातून झाले आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत महापालिकेला नागरिकाभिमुख बनविण्यात निळकंठ पोमण यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी केवळ विभागाच्या कार्यपद्धतीत नवकल्पना आणल्या नाहीत तर माहिती व तंत्रज्ञान विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल असा वारसा मागे ठेवला आहे.निळकंठ पोमण यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध योजना, उपक्रम आणि नागरिकाभिमुख कामकाज समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम केल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला. याप्रसंगी निळकंठ पोमण यांनी उपस्थितांचे आभार मानताना सांगितले की, महापालिकेच्या माध्यमातून समाजाशी थेट संवाद साधण्याची संधी ही माझ्यासाठी अभिमानास्पद ठरली. या प्रवासात मला महापालिकेतील सहकाऱ्यांचा उत्तम पाठिंबा मिळाला. येथील आठवणी अविस्मरणीय अशा आहेत.यावेळी उद्योगामार्फत सामाजिक क्रांती... श्री. निळकंठ पोमण यांचा सामाजिक क्षेत्रातील प्रवास या पुस्तकाचे देखील प्रकाशन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकात पोमण यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कात्रजमधील ३ गुन्हेगार तडीपार

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कात्रज भागातील तीन सराईत गुन्हेगारांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिले.अभय उर्फ सोन्या अशोक निसर्गंध (वय २०, रा. सिद्धीविनायक कॉलनी, आंबेगाव खुर्द), विनोद दिलीप धरतीमगर (वय २२, रा.



आंबेगाव बुद्रुक), प्रथमेश उर्फ अभय देविदास कुडले (वय २१, रा. दत्तनगर, आंबेगाव बुद्रुक) अशी तडीपार केलेल्या गुंडांची नावे आहेत. तिघांना पुणे शहर, जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निसर्गंध, धरतीमगर, कुडले विरुद्ध भारती विद्यापीठ आणि आंबेगाव पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तिघांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचा प्रस्ताव आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी तयार केला होता. संबंधित प्रस्ताव पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मोहिते यांनी मंजुरी देऊन तिघांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले.

## अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या महिला पोलिस अधिकाऱ्याला न्यायालयाचा दिलासा

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिला वरिष्ठ पोलिस निरीक्षकाच्या बदलीचा आदेश प्रशासकीय न्यायाधिकरणाने रद्द करत पोलिस प्रशासनाला जबर धक्का दिला आहे. हा आदेश ‘मनमानी’ आणि ‘सूडबुद्धी’ने घेतल्याचे स्पष्ट निरीक्षण न्यायाधिकरणाने नोंदवले असून, या निर्णयामुळे संबंधित महिला अधिकाऱ्यास मोठा दिलासा मिळाला आहे.

जुलै २०२४ मध्ये पुणे शहरात बदली होऊन दाखल झालेल्या या महिला निरीक्षकाला जून २०२५ मध्ये बंदोबस्त ड्युटीवर असताना शिवाजी रस्त्यावर विनयभंगाचा सामना करावा लागला. धाडसाने त्यांनी तत्काळ वरिष्ठांना कळवून फरासखाना पोलिस ठाण्यात सराईत गुन्हेगार आणि भाजपचा कार्यकर्ता प्रमोद कोंढरेविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# ‘ड्राय डे’ला मध्यवर्ती भागात उघड दारू विक्री; मटका किंगसह तिघांविरुद्ध गुन्हा

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण पुणे शहर व जिल्ह्यात बुधवारी (दि. २७) ‘ड्राय डे’ घोषित करण्यात आला असतानाही शहराच्या ऐन मध्यवर्ती भागात दारू विक्री सुरू असल्याचे उघडकीस आले. बुधवारी रात्री खडक पोलिसांच्या पथकाने शुक्रवार पेठेत छापा टाकून देशी, विदेशी दारूचा साठा जप्त केला. तर, कुख्यात मटका किंगसह तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

वैभव विजय डोंगरे (२६), गुड्डू कुमार भोलाकुमार कुमार (२६) आणि मटका किंग नंदू नाईक (रा . सर्व. शुक्रवार पेठ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस अंमलदार आशिष चव्हाण यांनी फिर्याद दिली आहे. बुधवारी रात्री शुक्रवार पेठ परिसरातील शाहू चौकानजिक असलेल्या रोनक बार येथे ही कारवाई करण्यात आली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दारूबंदीचे आदेश जारी केले होते. त्यानुसार बुधवारी (दि.२७) संपूर्ण जिल्ह्यात ड्राय डे होता. विशेषतः मध्यवर्ती भागात गणेशोत्सव असल्याने या ठिकाणी अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी वॉच ठेवला होता.त्यानुसार बुधवारी सायंकाळी खडक पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक कुलदीप व्हटकर, अंमलदार आशिष चव्हाण, हर्षल दुडूम, किरण ठवरे, नदाफ, फरांदे, गोरे यांच्यासह पथक हद्दीत गस्तीवर होते. त्यादरम्यान शाहू चौक, शुक्रवार पेठ येथील रोनक बारच्या पाठीमागील खोलीत अवैधरित्या दारू विक्री सुरू असल्याची माहिती अंमलदार आशिष चव्हाण यांना मिळाली.

पथकाने छापा टाकून दारू विकणाऱ्या वैभव डोंगरे व गुडुकुमार या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून विविध ब्रँडच्या देशी-विदेशी दारूच्या शेकडो बाटल्या, रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा तब्बल १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिस चौकशीत आरोपींनी सांगितले की, ते हा साठा नंदू नाईक याच्या सांगण्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्यांना विकत होते. त्यानंतर पोलिसांनी नाईकसह तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या पथकाने ही कारवाई केली

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कात्रजमधील ३ गुन्हेगार तडीपार

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कात्रज भागातील तीन सराईत गुन्हेगारांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिले.अभय उर्फ सोन्या अशोक निसर्गंध (वय २०, रा. सिद्धीविनायक कॉलनी, आंबेगाव खुर्द), विनोद दिलीप धरतीमगर (वय २२, रा. आंबेगाव बुद्रुक), प्रथमेश उर्फ अभय देविदास कुडले (वय २१, रा. दत्तनगर, आंबेगाव बुद्रुक) अशी तडीपार केलेल्या गुंडांची नावे आहेत.

तिघांना पुणे शहर, जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निसर्गंध, धरतीमगर, कुडले विरुद्ध भारती विद्यापीठ आणि आंबेगाव पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तिघांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचा प्रस्ताव आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी तयार केला होता. संबंधित प्रस्ताव पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मोहिते यांनी मंजुरी देऊन तिघांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले.

# आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते श्री गणरायाची आरती

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव उत्साह, भक्तीभाव आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत साजरा करण्यास सुरुवात झाली आहे. येथे आज सायंकाळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते श्री गणरायाची विधिवत आरती करण्यात आली. यावेळी गणपती बाप्पा मोरया च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.



पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाच्या वतीने गणेशोत्सवाचे आयोजन

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, सहशहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, महापालिका कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष मनोज माछरे, खजिनदार नितीन सनगीर यांच्यासह सनी कदम, विशाल भुजबळ, अभिषेक फुगे, विश्वनाथ लांडगे, दत्ता ढगे, ईश्वर आठवल, गणेश जाधव, विजया कांबळे, माया वाकडे, शितल पवार, योगिता पाटील यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी व महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.दरम्यान, गणेशोत्सवाच्या निमित्ताने कर्मचारी महासंघाच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २९ ऑगस्ट २०२५ रोजी श्री गणपती अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय गणरायाच्या मूर्ती विसर्जनावेळी पर्यावरणपूरक उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

# गोळ्या झेलाव्या लागल्या तरी चालेल; पण आरक्षणाशिवाय माघार नाही

जुन्नर - राज्यात आजवर कोणत्याही पक्षाला मराठ्यांशिवाय बहुमताची सत्ता लाभलेली नाही. मराठा समाजाने दिलेल्या पाठबळामुळेच सरकारे उभी राहिली; मात्र याच समाजावर शासनाने अन्याय केला आहे. त्यामुळे मराठा समाजाने आता चालीवर चाल टाकायला शिकले पाहिजे, अशा शब्दांत मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांनी शिवनेरी गडाच्या पायथ्याशी आयोजित पत्रकार परिषदेत सरकारला थेट इशारा दिला.

ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी मराठा आंदोलनाला अटी-शर्ती घालणे म्हणजे मराठ्यांचा अपमान आहे. सरकारने आडमुठी भूमिका सोडून कोणत्याही विलंब न लावता तातडीने आरक्षण जाहीर करावे. मराठा समाज सामान्य आहे, नियम पाळतो, संयम पाळतो, शांततेच्या मार्गाने आंदोलन करतो. पण या संयमाची चेष्टा करु नये. जरांगे पाटील यांनी जाहीर केले की, आज रात्री मुंबईत पोहोचून शुक्रवारी (दि.२९) सकाळपासून आझाद मैदानावर उपोषण सुरू होईल. आरक्षणाची अंमलबजावणी



तात्काळ करा. एक दिवसाचे आंदोलन म्हणजे विनोद आहे. आरक्षणासाठी गोळ्या झेलाव्या लागल्या तरी माघार नाही. आता आरक्षणाशिवाय आंदोलन थांबणार नाही.

पत्रकार परिषदेत जरांगे पाटलांनी स्पष्ट केले की, आरक्षण मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील. समाजातील प्रत्येक सामान्य मराठा यामध्ये सहभागी आहे. हे आंदोलन कोणी राजकीय नव्हे, तर मराठा बांधवांचे आहे. सरकारने याला परवानगी द्यावी. कारण हे आंदोलन एक दिवसाचे नाही, तर निर्णायक टप्प्यात गेले आहे. शासनाने दिलेली संधी वापरून समाजाचा अपमान न करता सन्मान करावा.

जरांगे पाटील यांनी सांगितले की, सरकारच्या शिष्टमंडळाकडून चर्चा होणार असल्याचा निरोप आला होता. आंदोलनाची दिशा संवादाकडे वळेल, अशी आशा होती. मात्र हे शिष्टमंडळ आलेच नाही. त्यातच आंदोलनासाठी केवळ एक दिवसाची अटी-शर्ती घालून दिलेली परवानगी म्हणजे सरळसरळ समाजाची थट्टा आहे. मराठा समाज आरक्षणाकडे आशेने पाहतोय. त्यांची अपेक्षा मोडून काढणे म्हणजे आगीशी खेळणे आहे, असे ते म्हणाले.

मराठ्यांचा अपमान नको, सन्मान हवा..

जरांगे पाटील यांनी ठणकावले - राज्यात सत्ता मराठ्यांनी दिली. पण उलट शासनाने याच समाजावर गोळ्या झाडल्या, लाठीमार केला. मराठा समाजाने आरक्षण मिळाल्यानंतर शासनाचा सन्मानच करायचा आहे. मुख्यमंत्री नाराजी ओढवून घेऊ नका, उलट समाजाची मने जिंका. आजच तुमच्या हाती संधी आहे - आरक्षण द्या आणि मराठ्यांचा विश्वास संपादन करा. मराठे उपकार विसरणारे नाहीत.